○ दि. १३ फेब्रुवारी २०२६
○ शुक्रवार
○ वर्ष ४ थे
○ अंक १०१
○ किंमत २ रूपये
○ पृष्ठे ४
○ लातूर
○RNINO.MHMAR/25/A1409

दैनिक
# अदिती एक्सप्रेस

संपादक - गंगाधर अभंग डिगोळे उपसंपादक : डॉ. ज्ञानेश्वर विठ्ठल कल्याणे ईमेल-aditiexpress33@gmail.com, **Website: www.aditiexpress.in**


### आजचे पंचाग

- दिनांक : १३ फेब्रुवारी २०२६
- वार : शुक्रवार
- माह (अमावस्यांत) : माघ
- माह (पूर्णिमांत) : फाल्गुन
- ऋतु : शिशिर
- आयन : उत्तरायण
- पक्ष : कृष्ण पक्ष
- तिथी : एकादशी तिथी (दुपारी ०२:२५ पर्यंत) त्यानंतर द्वादशी ि तथी
- नक्षत्र : मूळ नक्षत्र (सायंकाळी ०४:१२ पर्यंत) त्यानंतर पूर्वाषाढा नक्षत्र
- योग : वज्र योग (१३ फेब्रुवारी पहाटे ०३:२२ पर्यंत) त्यानंतर सिद्धि योग
- करण : बलवा करण (दुपारी ०२:२५ पर्यंत) त्यानंतर कौलव क रण
- चंद्र राशी : धनु राशी
- सूर्य राशी : कुंभ राशी
- अशुभ मुहुर्त:
- राहु काळ : सकाळी ११:२७ ते दुपारी १२:५३ पर्यंत
- शुभ मुहुर्त:
- अभिजित : दुपारी १२:३० ते दुपारी ०१:१६
- सूर्योदय : सकाळी ०७:०९
- सूर्यास्त : सायंकाळी ०६:३६
- संवत्सर : विश्वावसु
- संवत्सर(उत्तर) : सिद्धार्थी
- विक्रम संवत: २०८२ विक्रम संवत
- शक संवत: १९४७ शक संवत

## तुम्हाला भारतात यावेच लागेल, ही तुमची शेवटची संधी

### उच्च न्यायालयाने विजय मल्याला बजावले



मुंबई: मुंबई उच्च न्यायालयाने गुरुवारी (१२ फेब्रुवारी) फरार उद्योगपती विजय मल्ल्या यांच्याविरुद्ध कडक टिप्पणी केली आणि म्हटले की, जर तो भारतात परतला तरच त्याची याचिका ऐकली जाईल. न्यायालयाने असे निरीक्षण नोंदवले की, मल्ल्या भारतीय न्यायालयातून दिलासा मागत असताना कायदेशीर प्रक्रियेपासून वाचू शकत नाही. तुम्हाला परत यावे लागेल. जर तुम्ही परत येऊ शकत नसाल, तर आम्ही ही याचिका ऐकू शकत नाही, असे उच्च न्यायालयाने मल्ल्याला सांगितले आणि हे स्पष्ट केले की हे प्रकरण पुढे जाण्यासाठी त्याचे भारतात परत येणे ही एक पूर्वअट आहे.

न्यायालयाने पुढे म्हटले की; मल्ल्या कायदेशीर प्रक्रियेला टाळत आहेत आणि देशाबाहेर राहून याचिका दाखल करण्याचा फायदा घेऊ शकत नाहीत. न्यायालयासमोरील याचिका फरार आर्थिक गुन्हेगार (ऋएज) कायद्याच्या तरतुदींना आव्हान देते. मल्ल्या स्वत:ला भारतीय अधिकारक्षेत्रात सादर करत नाही तोपर्यंत ते याचिकेवर विचार करणार नाही असे उच्च न्यायालयाने सूचित केले.

२०१६ पासून युकेमध्ये वास्तव्य करणाऱ्या विजय मल्ल्याने मुंबई उच्च न्यायालयात दोन याचिका दाखल केल्या आहेत, त्यापैकी एक त्यांना फरार आर्थिक गुन्हेगार घोषित करण्याच्या आदेशाला आव्हान देणारी आहे आणि दुसरी फरार आर्थिक गुन्हेगार (ऋएज) कायदा, २०१८ च्या घटनात्मक वैधतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करणारी आहे. ७० वर्षीय मद्यसम्राटावर भारतात फसवणूक आणि मनी लॉंड्रिंगशी संबंधित अनेक खटले दाखल आहेत.

१८ फेब्रुवारी रोजी पुढील सुनावणीसाठी खंडपीठाने सांगितले की, मल्ल्याला भारतात परतण्यास इच्छुक आहे की नाही हे स्पष्ट करण्यासाठी ते आणखी एक संधी देत आहेत.

तुम्ही न्यायालयाच्या प्रक्रियेला टाळाटाळ करत आहात हे आम्हाला नोंदवावे लागू शकते. तुम्ही कार्यवाहीचा फायदा घेऊ शकत नाही. तुमच्याशी पूर्णपणे निष्पक्ष राहून, आम्ही याचिका फेटाळत नाही आहोत तर तुम्हाला आणखी एक संधी देत आहोत, असे न्यायालयाने निरीक्षण नोंदवले.

डिसेंबर २०२५ मध्ये झालेल्या मागील सुनावणीदरम्यान, खंडपीठाने आधीच सूचित केले होते की जर मल्ल्या भारतात परतले तरच ते याचिकेवर सुनावणी करतील आणि त्यांच्या वकिलांनाही ते स्पष्ट करण्यास सांगितले होते.

गुरुवारी, खंडपीठाने मल्ल्या यांना परत येण्याचा त्यांचा हेतू आहे की नाही हे स्पष्टपणे सांगणारे प्रतिज्ञापत्र दाखल करण्याचे निर्देश दिले. **(पान २ वर)**

## कोकणातील कातळशिल्पांच्या संशोधनासाठी ‘वर्ल्ड हेरिटेज डेस्क’



मुंबई : आद्य मानवी संस्कृतीची साक्ष देणाऱ्या कोकणातील कातळशिल्पांना जागतिक वारशाचा दर्जा मिळवून देण्यासाठी राज्य सरकारने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. या कातळशिल्पांच्या शास्त्रोक्त संशोधनासाठी आणि युनेस्को नामांकन प्रक्रियेला गती देण्यासाठी पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाने ‘वर्ल्ड हेरिटेज डेस्क’ स्थापन करण्यास प्रशासकीय मान्यता दिली आहे. त्याचप्रमाणे या प्रकल्पासाठी १४ कोटी ६२ लाख ३२ हजार ६७१ रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे.

कोकणात आढळलेली हजाराहून अधिक कातळशिल्पे आद्य ऐतिहासिक काळातील मानवी संस्कृतीचा अभ्यास करण्यासाठी अत्यंत महत्त्वाची मानली जातात. या शिल्पांचे पुरातत्त्वीय, सांस्कृतिक आणि जैविक महत्त्व जागतिक पातळीवर अधोरेखित करण्यासाठी केंद्र सरकारने यापूर्वीच युनेस्कोकडे प्रस्ताव सादर केला आहे. राज्य सरकारने स्थापन केलेल्या नव्या डेस्कमुळे या प्रक्रियेला संस्थात्मक बळ मिळणार आहे.

‘वर्ल्ड हेरिटेज डेस्क’ २०२६ ते २०२९ या कालावधीत कार्यरत राहणार असून त्याच्या मुंबई आणि रत्नागिरी अशा दोन शाखा असतील. मुंबई शाखा संशोधन आणि समन्वयाची जबाबदारी सांभाळेल. भारतीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील कातळशिल्पांवरील साहित्याचा सखोल आढावा घेणे, ऐतिहासिक नकाशे व उपग्रह प्रतिमांच्या साहाय्याने तांत्रिक अभ्यास करणे आणि कातळशिल्पांचा अद्ययावत माहितीकोश तयार करणे ही या शाखेची प्रमुख कामे असतील. तसेच, युनेस्कोच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार सर्वेक्षण, नोंदणी आणि संवर्धनासाठी मानके **(पान २ वर)**

## काँग्रेसच्या खासदारांकडून लोकसभा अध्यक्षांना शिवीगाळ; भाजपा नेत्याकडून व्हिडीओ शेअर



मुंबई: केंद्रीय मंत्री किरेन रिजिजू यांनी गुरुवारी (१२ फेब्रुवारी) लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांच्या सभागृहातील एक व्हिडिओ शेअर केला. ४ फेब्रुवारी रोजी संसदेत विरोधी पक्ष आणि सरकार यांच्यात झालेल्या संघर्षादरम्यान काँग्रेस खासदारांच्या एका मोठ्या गटाने त्यांना शिवीगाळ केली आणि पंतप्रधान नरेंद्र मोदींना धमकावले असा आरोप त्यांनी केला. या व्हिडिओमध्ये लोकसभा अध्यक्षांच्या दालनात काँग्रेस पक्षाच्या महिला खासदार दिसत आहेत, जिथे त्या भाजप मंत्र्यांशी वाद घालताना दिसत आहेत.

केंद्रीय मंत्री किरेन रिजिजू यांनी १० फेब्रुवारी रोजी लोकसभेतील गोंधळाचा व्हिडीओ पोस्ट केला होता. पंतप्रधान मोदींचे राष्ट्रपतींच्या अभिभाषणावर उत्तराचे भाषण होणार होते. पण, काँग्रेसच्या महिला खासदार पंतप्रधानांच्या आसनाजवळ गेल्याने गोंधळ झाला होता. **(पान २ वर)**

## तब्बल ७८ वर्षांनंतर पंतप्रधान कार्यालयाचा पत्ता बदलणार




दिल्ली: पंतप्रधान नरेंद्र मोदी उद्या म्हणजेच शुक्रवार १३ फेब्रुवारी रोजी दुपारी पंतप्रधान कार्यालयचा (पीएमओ) पत्ता बदलणार आहेत. तब्बल ७८ वर्षांनंतर पीएमओचं ऑफिस स्थलांतरित करण्यात येणार आहे.

मिळालेल्या माहितीनुसार साउथ ब्लॉकमधून 'सेवा तीर्थ' नावाच्या नवीन बांधलेल्या इमारतीत हे ऑफिस हलवण्यात येणार आहे. त्यापूर्वी पंतप्रधान मोदी साउथ ब्लॉकमध्ये झालेल्या शेवटच्या मंत्रिमंडळ बैठकीचे अध्यक्षस्थान भूषवतील. या बैठकीनंतर, केंद्रीय मंत्री आणि वरिष्ठ अधिकारी रायसिना हिलवरील एक किलोमीटरपेक्षा कमी अंतरावर असलेल्या नवीन संकुलात जातील.

मिळालेल्या माहितीनुसार; मागील ५ दशकांपासून सरकारच्या सर्व महत्त्वाच्या निर्णयाचं केंद्र राहिलेले साऊथ ब्लॉकमधील पंतप्रधानांचे कार्यालय आता ब्रिटीश कालीन इमारतीतून नव्या सेवा तीर्थ येथे शिफ्ट होणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी शुक्रवारी साऊथ ब्लॉकमध्ये होणाऱ्या कार्यालयात अखेरची कॅबिनेट बैठक घेतील. त्यानंतर नव्या प्रशासकीय भवनाचे उद्घाटन करण्यात येईल. रायसीना हिलजवळ नवी प्रशस्त इमारत साऊथ ब्लॉकपासून काहीच अंतरावर आहे. **(पान २ वर)**

## पुतिन सरकारकडून व्हॉट्सॲपसह अनेक सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर बंदी

रशिया - रशियामध्ये अनेक प्रमुख आंतरराष्ट्रीय डिजिटल प्लॅटफॉर्मवर बंदी घालण्यात आली आहे. मीडिया रिपोर्ट्सनुसार, व्हॉट्सॲप, यूट्यूब, इंस्टाग्राम आणि फेसबुक सारखे लोकप्रिय प्लॅटफॉर्म आता रशियात वापरण्यास बंदी आहे.

अहवालांनुसार, केवळ सोशल मीडिया प्लॅटफॉर्मच नाही तर अनेक आंतरराष्ट्रीय मीडिया संस्थांच्या वेबसाइट्सवरही सरकारकडून बंदी घालण्यात आली आहे. यामध्ये बीबीसी, ड्यूश वेले, रेडिओ फ्री युरोप आणि रेडिओ लिबर्टी सारख्या साइट्सचा समावेश आहे. अनामिक ब्राउझिंगसाठी वापरला जाणारा टॉर ब्राउझर देखील ब्लॉक करण्यात आला आहे.

डिजिटल क्षेत्राच्या सुरक्षिततेसाठी:

रशियाने आपल्या डिजिटल क्षेत्राला सुरक्षित करण्यासाठी आणि स्थानिक प्लॅटफॉर्मना प्रोत्साहन देण्यासाठी व्हॉट्सॲपवर निर्बंध कडक केले आहेत. बुधवार (११ फेब्रुवारी २०२६) रोजी समोर आलेल्या माहितीनुसार, रशियन अधिकाऱ्यांनी व्हॉट्सॲप पूर्णपणे ब्लॉक करण्याच्या दिशेने पावले उचलली आहेत.

स्वदेशी 'MAX' या ॲपचा वापर वाढवण्यासाठी:

यामागील उद्देश सुमारे १० कोटी वापरकर्त्यांना रशियाच्या स्वदेशी 'MAX' या ॲपकडे वळवणे हा आहे. **(पान २ वर)**

## आमदार अभिमन्यू पवार यांच्या पाठपुराव्याला यश

### किल्लारी क्र. २ बंधाऱ्याच्या दुरुस्तीसाठी १.८६ कोटींचा निधी मंजूर

**दै. अदिती एक्सप्रेस**

औसा- औसा तालुक्यातील शेतकऱ्यांसाठी दिलासादायक निर्णय घेत शासनाने तेरणा नदीवरील किल्लारी क्र. २ (लातूर पद्धती) बंधाऱ्याच्या यांत्रिकी व विद्युत घटकांच्या दुरुस्तीसाठी १ कोटी ८६ लाख रुपयांच्या प्रस्तावास प्रशासकीय मान्यता दिली आहे. आमदार अभिमन्यू पवार यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे हा निधी मंजूर झाल्याचे सांगितले जात आहे. धरण सुरक्षितता आणि सुलभ द्वार परिचालनाच्या दृष्टीने ही दुरुस्ती अत्यंत महत्त्वाची मानली जात असून, त्यामुळे परिसरातील शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे.

किल्लारी क्र. २ बंधारा हा लातूर जिल्ह्यातील किल्लारी क्र. २ गावाजवळ तेरणा नदीवर उभारण्यात आला असून, तो तेरणा धरण स्थळापासून सुमारे २५.०५ कि.मी. अंतरावर आहे. या बॅरेजचा एकूण संकल्पित पाणीसाठा १.३०४ दशलक्ष घनमीटर असून १९४ हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली आणण्याची क्षमता आहे. सन २०१५ मध्ये हा प्रकल्प पूर्ण झाला आणि त्याच वर्षी प्रथमच पाणी साठविण्यात आले. त्यानंतर सन २०१९ मध्ये प्रकल्प व्यवस्थापन विभागाकडे देखभाल व द्वार परिचालनासाठी हस्तांतरित करण्यात आला.मात्र प्रकल्प पूर्ण झाल्यापासून बंधाऱ्यातील द्वारे व उच्चालक यंत्रणेची आवश्यक दुरुस्ती झालेली नव्हती. मुख्य अभियंता (यांत्रिकी), जलसंपदा विभाग, नाशिक यांनी दि. १२ सप्टेंबर २०२३ रोजी मांजरा नदी खोऱ्यातील विविध बंधारे व बॅरेजची पाहणी केली असता, यांत्रिकी व विद्युत घटकांच्या दुरुस्तीची आवश्यकता असल्याचे निदर्शनास आले. त्यामध्ये किल्लारी क्र. २ बंधाऱ्याचाही समावेश करण्यात आला होता.

महामंडळ स्तरावर निधी उपलब्ध नसल्यामुळे ही कामे विशेष दुरुस्ती अंतर्गत प्रस्तावित करण्यात आली होती. आमदार अभिमन्यू पवार यांनी यासाठी शासनस्तरावर सातत्याने पाठपुरावा केल्यानंतर शासनाने १.८६ कोटी रुपयांच्या निधीस मान्यता दिली. **(पान २ वर)**

## धनंजय मुंडेंच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यास मोठे यश

### ऊसतोड कामगारांच्या मुला - मुलींना दर्जेदार शिक्षणाची वाट मोकळी



मुंबई (प्रतिनिधी) - लोकनेते स्वर्गीय गोपीनाथराव मुंडे ऊसतोड कामगार कल्याण महामंडळाच्या अंतर्गत तत्कालीन सामाजिक न्याय मंत्री धनंजय मुंडे यांनी सुरू केलेल्या संत भगवान बाबा शासकीय वसतीगृह योजनेला व्यापक स्वरूप प्राप्त होत असून धनंजय मुंडे यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला मोठे यश आले आहे.

धनंजय मुंडे यांनी सामाजिक न्याय मंत्री असताना २५ जून, २०२१ रोजी या योजनेची घोषणा करून प्रत्यक्षात अंमलबजावणी सुरू केली होती. त्यामुळे मुंडे जनक असलेल्या संत भगवान बाबा शासकीय वसतीगृह योजनेच्या माध्यमातून बीड जिल्ह्यातील सर्व ११ तालुक्यांमध्ये शंभर क्षमतेचे मुलींसाठी एक व मुलांसाठी एक असे एकूण २२ वसतीगृह मंजूर करून भाड्याच्या जागेत सुरू करण्यात आलेले आहेत. दरम्यान त्यापैकी आतापर्यंत तीन वसतीगृहांना स्वतःची जागा व निधी मिळालेला असून त्याचे बांधकाम प्रगतीपथावर असून, **(पान २ वर)**

## लातुरात अखिल महाराष्ट्र जनरल कामगार संघटनेचा जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा

### केंद्र सरकारने कामगारहिताचे कायदे रद्द केल्याच्या निषेधार्थ रोष

**दै. अदिती एक्सप्रेस**



लातूर: केंद्रातील मोदी सरकारने कामगारांचे हक्क आणि अधिकार असलेले २९ कामगार कायदे रद्द करून नवीन चार कायदे केलेत. हे नवीन चार कायदे कामगारांना व कर्मचाऱ्यांना गुलाम बनवणारे असल्याने ते त्वरित परत घ्यावेत. या व अन्य विविध मागण्यासाठी आज १२ फेब्रुवारी रोजी कामगार संघटनानी देशभर संप पुकारला होता. त्याचाच भाग म्हणून अखिल महाराष्ट्र जनरल कामगार संघटनेच्या वतीने आज सकाळी १२ वाजता साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे चौक ते जुने जिल्हाधिकारी कार्यालय, शिवाजी चौक लातूर येथे विराट मोर्चा काढण्यात आला. या मोर्चात लातूर जिल्ह्यातील कष्टकरी, श्रमिक व कामगार मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. या मोर्चाचे नेतृत्व कामगार नेते तथा अखिल महाराष्ट्र जनरल कामगार संघटनेचे संस्थापक अध्यक्ष राजकुमार होळीकर यांनी केले.

मोदी सरकारने कामगारांच्या हिताचे तब्बल २९ कायदे रद्द करून चार नवीन कायदे केले आहेत. त्यामुळे कामगार वर्गाचे मोठे नुकसान होणार आहे. कामगारांची पिळवणूक करून त्यांना उध्वस्त करण्याचा डाव भाजप सरकारचा आहे. घरेलू कामगार, बांधकाम कामगार, माथाडी कामगार, कंत्राटी कामगार यांच्या हक्क आणि अधिकारांचे रद्द केलेले २९ कामगार कायदे पुन्हा प्रस्थापित करून त्याची अंमलबजावणी करण्यात यावी, कामाच्या तासांत वाढ करू नये, कायम स्वरूपी बारमाही कामामध्ये कंत्राटी कामगार पद्धत बंद करण्यात यावी, सरकारी, निमसरकारी, सार्वजनिक उद्योग, सेवा उद्योग, नगरपालिका, महानगर पालीका अशा ठिकाणी अस्थाई वर्षानुवर्षे काम करणाऱ्या कंत्राटी, हंगामी, रोजदारी, मानधनावरील कामगाराना/ कर्मचाऱ्यांना विनाअट कायम करण्यात यावे, लोकशाही व स्वातंत्र्य हिरावून घेणारा महाराष्ट्र जनसुरक्षा कायदा रद्द करण्यात यावा, नोंदणीकृत बांधकाम कामगारांच्या पाल्याना देण्यात येणाऱ्या **(पान २ वर)**

## देवस्थान समिती व शासकीय यत्रंणांच्या समन्वयातून यात्रा महोत्सव यशस्वी करावा : जिल्हाधिकारी केशन नेटके




**दै. अदिती एक्सप्रेस**

लातूर/प्रतिनिधी : लातूरचे ग्रमदैवत असलेल्या श्री सिध्देश्वर व रत्नेश्वर देवस्थानच्या वतीने यावर्षी १५ फेब्रुवारी ते २ मार्च या दरम्यान महाशिवरात्री यात्रा महोत्सव पार पडत आहे. या यात्रा महोत्सवाच्या माध्यमातून लातूरची गौरवशाली परंपरा अधिकाधिक उज्ज्वल करत यात्रा महोत्सव यशस्वी करण्यासाठी देवस्थान समितीच्या सहकार्यातून सर्व शासकीय यंत्रणांनी सतर्क रहावे, अशी सूचना अतिरिक्त जिल्हाधिकारी केशव नेटके यांनी दिली आहे.

लातूर येथील जिल्हाधिकारी कार्यालयात श्री सिध्देश्वर व रत्नेश्वर महाशिवरात्री यात्रा महोत्सवाची पूर्व तयारी आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठक अतिरिक्त जिल्हाधिकारी केशव नेटके यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती. यावेळी देवस्थानचे प्रशासक सचिन जांबूतकर, ज्येष्ठ विश्वस्त तथा माजी नगराध्यक्ष विक्रम गोजमगुंडे, अशोक भोसले, नरेश पंड्या, रमेशसिंह बिसेन, व्यंकटेश हालिंगे, विशाल झांबरे, ओम गोपे यांच्यासह प्रशासकीय अधिकारी उपस्थित होते.

श्री सिध्देश्वर व रत्नेश्वर देवस्थानच्या वतीने आयोजित होत असलेली महाशिवरात्री यात्रा महोत्सव हे लातूरचे वैभव आहे. या यात्रेची महती लातूर जिल्ह्यासह परजिल्ह्यात व इतर राज्यातही पोहोचली आहे. यामुळे या यात्रा महोत्सवासाठी मोठ्या प्रमाणात भाविक व नागरिकांची मोठी गर्दी होते. ही गर्दी लक्षात घेवून प्रशासकीय यंत्रणांनी योग्य ते नियोजन करावे, असे सांगून अतिरिक्त जिल्हाधिकारी केशव नेटके म्हणाले की, वाहतूक, पार्कींग व सुरक्षितेच्या दृष्टीकोणातून शहर **(पान २ वर)**

# संभाषण कौशल्ये : प्रभावी संवादाचे मूलमंत्र देणारे पुस्तक

'संभाषण कौशल्ये' हे पुस्तक डॉ. पूनम प्रकाश वाघ (बनकर ) यांनी आजच्या युगासाठी संभाषण कौशल्याची गरज ओळखून लिहिलेले आहे. एकूण पाच प्रकरणामध्ये त्याची विभागणी केलेली आहे. खरे तर संभाषण कौशल्याची गरज आजच्या काळात खूप वाढलेली आहे. जागतिकीकरण आणि माहिती तंत्रज्ञानाच्या युगात कुशल संभाषण कौशल्ये ज्यांच्याकडे आहेत तेच यशस्वी होणार आहेत. याचाच धागा पकडून डॉ. वाघ या हे पूस्तक वाचकाच्या हाती सोपवत आहेत.

संभाषण कौशल्ये म्हणजे केवळ बोलणे नाही, तर योग्य प्रकारे विचार मांडणे, समोरच्याला समजून घेणे, समोरच्यांसोबत प्रभावी संवाद साधणे होय. बराचसा संवाद तर हावभावाच्या भाषेतून सुद्धा साधला जातो. म्हणून संवाद साधताना त्याला पूरक हावभाव सुद्धा तितकेच महत्त्वाचे असतात. संभाषण आपल्याला त्या त्या वयोगटानुसार करता आले पाहिजे. वयोवृद्ध ते बालक यांच्याशी ज्या पद्धतीने संवाद साधायला पाहिजे किंवा त्यांच्याशी संभाषण करायला पाहिजे याचे ज्ञान आपल्याला असले पाहिजे. म्हणजे संभाषण कौशल्ये ही एक चांगली कला आहे.

सध्याचे युग हे स्पर्धेचे युग आहे. या स्पर्धेच्या युगामध्ये आपल्याकडे जेवढी ज्ञानाची आवश्यकता आहे तेवढीच ती मांडण्याची कलासुद्धा महत्त्वाची आहे. अगोदरच आपल्याकडे म्हटले जाते 'बोलणाऱ्याच्या अंबाड्या विकतात पण न बोलणाऱ्याचे गहू सुद्धा विकत नाहीत' म्हणून आपल्याकडे प्रभावी संभाषण कौशल्ये असण्याची गरज आहे. ज्ञान-विज्ञान, तंत्रज्ञान, व्यापार, व्यवसाय या क्षेत्रामध्ये ज्ञान मांडण्यासाठी, त्याचा योग्य वापर करण्यासाठी, इतरांकडून योग्य पद्धतीने काम करून घेण्यासाठी संभाषण कौशल्ये असणे काळाची गरज आहे.

कंपनी सारख्या क्षेत्रामध्ये आपण बऱ्याच वेळी ऐकतो की अमूक मुलाला ८० लाख, ७० लाखाचे पॅकेज मिळाले, तर काहींना खूप कमी लाखाचे पॅकेज मिळते. त्याचे कारण त्याच्याकडे असलेले ज्ञान, मुलाखतीच्या दरम्यान संभाषण कौशल्यातून त्याने योग्यरित्या मांडलेले असते. एकाच महाविद्यालयातून शिक्षण घेतलेल्या प्रत्येकाला वेगवेगळे पॅकेज भेटलेले असते तो याचाच भाग आहे. म्हणून संभाषण कौशल्याचे महत्त्व आजच्या शैक्षणिक, व्यावसायिक, राजकीय, सामाजिक आणि वैयक्तिक जीवनात खूप महत्त्वाचे आहे.

आजच्या काळामध्ये संभाषण कौशल्ये खूप महत्त्वाचे असण्याचे कारण नेतृत्व कौशल्ये संपादन करण्यासाठी, निर्णय क्षमतेसाठी, नातेसंबंध प्रबळ करण्यासाठी, समस्यांचे निराकरण करण्यासाठी , ताणतणाव कमी करण्यासाठी, सकारात्मकतेसाठी, करिअर करण्यासाठी, व्यावसायिक यशासाठी, शैक्षणिक व वैचारिक विकासासाठी, डिजिटल युगातील योग्य शब्दांच्या निवडीसाठी आहे. संभाषण कौशल्ये विकसित करायचे असेल तर आपल्यामध्ये आत्मविश्वास असायला हवा. सर्व भाषेचा शब्दसाठा, नियमित सराव, शारीरिक भाषेचा योग्य वापर, सरळ व सोपी भाषा आणि सर्वात महत्त्वाचे इतरांचे लक्षपूर्वक ऐकण्याची सवय लावणे या गोष्टीवर लक्ष आयला हवे.

या सर्व बाबींचा अभ्यास करुनच डॉ. वाघ यांनी संभाषण कौशल्ये हे अतिशय सविस्तर, अभ्यासपूर्वक असे पुस्तक लिहिलेले आहे. या पुस्तकाचे चिंतन,मनन करून आपण आपले संभाषण कौशल्ये नक्कीच वाढवू शकतो. या पुस्तकातील ज्ञानामुळे आपल्या आयुष्याला नक्कीच कलाटणी मिळणार आहे असे मला वाटते. नोकरी, व्यवसाय, नाती गोती, ज्ञान-विज्ञान, तंत्रज्ञान यासाठी पूरक ठरणार आहे. पहिले प्रकरण संभाषणाचे स्वरूप, प्रक्रिया आणि महत्व विशद करणारे आहे. यामुळे आपल्याला आजच्या स्पर्धेच्या युगात संभाषणाचे कौशल्ये




सुधारण्यास मदत होणार आहे.

दुसऱ्या प्रकरणात संभाषणाचे प्रकार कोणते? कशाप्रकारे वापरात येतात? यावर सविस्तर चर्चा करून माहितीचे सादरीकरण केलेले आहे. संभाषण कौशल्ये विकसित करण्यासाठी आपल्याला बऱ्याच गोष्टीचे ज्ञान असावे लागते. संभाषण ही एक संवादात्मक प्रक्रिया आहे. ज्यामध्ये दोन किंवा अधिक व्यक्ती आपापसात विचार भावना, सूचना आणि माहिती यांचे आदान प्रदान करतात. संभाषण कौशल्ये उत्तम असेल तर व्यक्ती इतरांवर आपली छाप सहज पाडतात. प्रत्यक्ष संभाषण अप्रत्यक्ष संभाषण, औपचारिक संभाषण, अनौपचारिक संभाषण, सार्वजनिक संभाषण, व्यावसायिक संभाषण, लेखन संभाषण हे संभाषणाचे प्रकार आहेत. याची उपयुक्तता प्रसंगपरत्वे, व्यक्तिपरत्वे विकसित झालेली पहायला मिळते.

डॉ. वाघ यांनी तिसऱ्या प्रकरणात संभाषणात येणारे अडथळे व त्यावर कशी मात करायला हवी यावर सविस्तर विवेचन केले. ते जर आपण चांगल्या पद्धतीने आत्मसात केले तर आपले संभाषण कौशल्ये नक्कीच विकसित होतील याची त्यांना खात्री वाटते. संवाद हा सुसंवादात रूपांतरीत करण्यासाठी आपल्याला त्याचे ज्ञान आत्मसात करणे गरजेचे आहे. बऱ्याच वेळी आपल्याकडे ते ज्ञान असते पण त्याचे वापरण्याचे कौशल्ये माहीत नसते. ते कौशल्ये आत्मसात केल्यानंतर संभाषण चांगले करता येते. संभाषण कौशल्ये विकसित करण्यासाठी आपल्याला काही गोष्टीवर मात करावी लागते. मग त्या गोष्टी कोणत्या ? त्यावर मात कशी करायची ? अडथळे कोणती आहेत ? यावरील अतिशय सूक्ष्मपणे मांडणी डॉ. वाघ यांनी करून दिलेली आहे.

चौथ्या प्रकरणामध्ये संभाषण कौशल्ये विकसित करण्यासाठीचे सविस्तर मार्गदर्शन केले आहे. जगातील प्रत्येक व्यक्तीला इतरांवर आपला प्रभाव पडावा वाटतो. हा प्रभाव केवळ चांगले कपडे परिधान केल्यामुळे, दागदागिने घातल्यामुळे पडतो असे नव्हे तर त्यासाठी संभाषण कौशल्येही तितकेच महत्वाचे असतात. त्यासाठी डॉ. वाघ यांनी संभाषण कौशल्ये विकसित करण्याची गुरुकिल्लीच आपल्या हातात दिलेली आहे. आणि शेवटचे प्रकरण संभाषण कौशल्यामुळे व्यक्तिमत्त्व विकास कसा होतो, त्यासाठी कशा पद्धतीने आपण मार्गक्रमण करायला हवे यावरील सविस्तर विवेचन आलेले आहे. व्यक्तिमत्त्व विकास म्हणजे एखाद्या व्यक्तीचे विचार, वर्तन आणि वृत्ती सुधारण्याची एक सतत चालणारी प्रक्रिया आहे. ज्यामुळे आपले जीवन सुखकर होते. आणि व्यक्तिमत्त्व विकास होण्यासाठी संभाषण कौशल्ये हा घटक तितकाच महत्त्वाचा आहे.

डॉ. वाघ यांनी या पुस्तकाची निर्मिती करत असताना राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०, व्यावसायाभिमुख विकास, व्यक्तिमत्त्व विकास व प्रभावी जीवन जगण्याचा धागा पकडून केलेली आहे.सद्यस्थितीत प्रत्येकाचा कल प्रभावी जीवन जगण्याकडे झुकलेला दिसतो.कोणत्याही एका क्षेत्रातील ज्ञान आपल्याकडे असून चालत नाही. एखाद्याच गोष्टीवर अवलंबून चालत नाही. आणि आपण अनेक क्षेत्रातील ज्ञान संपादित केले तरी ते मांडण्याची कला आपल्याकडे असणे गरजेचे आहे. ते मांडण्यासाठी आपल्याकडे संभाषण कौशल्ये असायला हवे. त्यामुळे डॉ. वाघ यांनी संभाषण कौशल्ये विकसित करण्यासाठीचे मार्गच या पुस्तकातून आपल्याला दिले आहेत. आपण सर्वजण या पुस्तकाचे स्वागत करालच. डॉ. वाघ यांना व त्यांच्या साहित्यकृतीला माझ्या मनःपूर्वक शुभेच्छा !



**- डॉ.नरसिंग कदम**
सदस्य,मराठी विश्वकोश
निर्मिती मंडळ महाराष्ट्र राज्य,मुंबई
तथा प्रोफेसर छत्रपती शिवाजीराजे
महाविद्यालय, उदगीर जि. लातूर
९४०४७३१०१०

## कॉपीची कुप्रथा

आपल्याकडे फेब्रुवारी - मार्च हा परीक्षांचा काळ असतो. या महिन्यात परीक्षा पार पाडण्याची जणू परंपराच आहे. दहावी - बारावी या बोर्डाच्या परीक्षा याच काळात असतात. इतकेच काय तर शिष्यवृत्ती, नवोदय, मंथन यासारख्या स्पर्धा परीक्षा देखील याच काळात होतात. यावर्षी बारावीची बोर्ड परीक्षा १० फ ब्रुवारी पासून सुरू झाली असून ती ११ मार्चला संपणार आहे तर दहावीची परीक्षा २० फेब्रुवारी ते १८ मार्च दरम्यान होणार आहे. या परीक्षा म्हणजे विद्यार्थ्यांच्या आयुष्यातील मैलाचा दगड असतात. विद्यार्थ्यांच्या जीवनाला कलाटणी देणाऱ्या या परीक्षा असतात. दरवर्षी लाखो विद्यार्थी या परीक्षेला बसतात. यावर्षीही लाखो विद्यार्थी दहावी - बारावीची परीक्षा देणार आहेत. ज्या विद्यार्थ्यांनी वर्षभर मन लावून अभ्यास केलाय ते विद्यार्थी या परीक्षांना बेधडकपणे सामोरे जातात मात्र ज्या विद्यार्थ्यांचा पुरेसा अभ्यास झाला नाही ते विद्यार्थी गैरमार्गाने ही परीक्षा उत्तीर्ण होण्याचा प्रयत्न करतात. त्यातीलच एक गैरमार्ग म्हणजे कॉपी. दहावी बारावीच्या परीक्षेत दरवर्षी हजारो विद्यार्थी कॉपी करताना आढळतात. काहींवर कारवाई होते तर काहींना समज देऊन सोडून दिले जाते मात्र कॉपीची ही किड मुळापासून उखडून टाकली जात नाही. कॉपी ही आपल्या शिक्षण व्यवस्थेला लागेलेली किड आहे. वर्षभर अभ्यास न करता परीक्षेच्या दिवशी कॉपी करून उत्तीर्ण होण्याकडे विद्यार्थ्यांचा कल वाढत आहे. ही धोक्याची घंटा आहे म्हणूनच खुद्द पंतप्रधानांना देखील यात लक्ष घालावे लागले होते. मागील वर्षी मन की बात या आपल्या कार्यक्रमात पंतप्रधानांनी याच विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले होते. या कार्यक्रमाच्या माध्यमातून लाखो विद्यार्थ्यांना पंतप्रधानांनी कॉपी केल्याने आयुष्य घडवता येत नाही असा कानमंत्र दिला होता. कॉपी करून आपण एखादी परीक्षा उत्तीर्ण होऊ शकतो मात्र जीवनाच्या परीक्षेत उत्तीर्ण होण्यासाठी कॉपी नव्हे तर अपार मेहनतच करावी लागते. जीवनात यशस्वी व्हायचे असेल तर मेहनतीला पर्याय नाही असा संदेशही पंतप्रधानांनी विद्यार्थ्यांना दिला होता मात्र विद्यार्थ्यांनी पंतप्रधानांचा हा संदेश अंमलात आणला नाही असेच म्हणावे लागेल कारण सध्या चालू असलेल्या बारावीच्या परीक्षेत राज्यातील अनेक भागात मास कॉपी झाल्याची बातमी वर्तमानपत्रात वाचायला मि ळाली. बीड, जालना यासारख्या शहरात कॉपीमुक्त परीक्षा या शिक्षण विभागाच्या अभियानाला हरताळ फासला गेला. अनेक परीक्षा केंद्रावर विद्यार्थी कॉपी करताना आढळले. काही परीक्षा केंद्रावर मास कॉपी होत असल्याचा व्हिडिओ देखील व्हायरल झाला. याप्रकरणी काही पर्यवेक्षक आणि केंद्र संचालकांवर शिक्षण विभागाने कारवाई देखील केली आहे. दहावी - बारावी परीक्षेत कॉपी होऊ नये यासाठी शिक्षण विभाग विविध पावले उचलत असताना विद्यार्थ्यांकडून त्यास पुरेसा प्रतिसाद मिळत नाही असेच म्हणावे लागेल. दरवर्षी कॉपी करणाऱ्या मुलांची संख्या वाढतच चालली आहे. कॉपीची कुप्रथा कमी होण्याऐवजी वाढतच चालली आहे. वर्षभर अभ्यास न करणारे विद्यार्थी कॉपीच्या या कुप्रथेचे आवर्जून पालन करतात. काही ठिकाणी तर काही शाळा आणि संस्था देखील निकाल चांगला लागावा म्हणून या कुप्रथेला प्रोत्साहन देतात. काही पालकही आपल्या पाल्यांना कॉपी पुरवण्यासाठी जीवाचे रान करतात. शाळेच्या, परीक्षा हॉलच्या बाहेर कॉपी पुरवण्यासाठी तोबा गर्दी उसळते. झेरॉक्स दुकानांवर देखील तेवढीच गर्दी असते. अर्थात परीक्षेत कॉपी होऊ नये म्हणून प्रशासन सर्वोतोपरी प्रयत्न करते हे मान्यच करावे लागेल. राज्यात कॉपीमुक्त परीक्षा व्हावी यासाठी प्रशासनाकडून विविध प्रकारचे अभियान राबवले जाते. भरारी पथक हे त्यापैकीच एक अभियान. बोर्डाच्या परीक्षा सुरू असताना काही अधिकारी बोर्डाकडून नेमले जातात. हे अधिकारी परीक्षा केंद्रावर अचानक भेटी देऊन परीक्षा केंद्रावर धाक बसवतात. कॉपी करताना कोणी विद्यार्थी आढळला तर त्याच्यावर कारवाई केली जाते. त्यांचे थेट निलंबन केले जाते. पण कॉपी बहाद्दरांना तुरुंगात टाकण्याची तरतूद आपल्याकडील कायद्यात नाही मात्र देशातील काही राज्यात कॉपी करणाऱ्या विद्यार्थ्यांना थेट तुरुंगात पाठवण्याचा कायदा आहे. आपल्याकडे देखील आता कॉपी करणाऱ्या विद्यार्थ्यांना वचक बसावा आणि राज्यात कॉपीमुक्त परीक्षा व्हाव्यात यासाठी राज्यसरकार प्रयत्न करत आहे. त्यासाठी त्यांनी अनेक कठोर निर्णय घेतले आहेत. कॉपीमुक्त अभियानासाठी राज्यसरकार जे प्रयत्न करीत आहे ते स्वागतार्ह असले तरी कठोर कायदे करूनच कॉपीला आळा घालता येईल असे नाही तर कॉपी करू नये यासाठी विद्यार्थ्यांचे प्रबोधनही करायला हवे. कॉपी करणारा विद्यार्थी परीक्षेत उत्तीर्ण होऊ शकतो मात्र जीवनाच्या परीक्षेत तो उत्तीर्ण होऊ शकत नाही. जीवनाच्या प्रत्येक पावलावर परीक्षा असतात . त्यात उत्तीर्ण होण्यासाठी कॉपी नव्हे तर कठोर मेहनतच घ्यावी लागते. कठोर मेहनतीशिवाय फळ मिळत नाही. जीवनात यशस्वी व्हायचे असेल तर कॉपिसारख्या कुप्रथेला मूठमाती द्यावीच लागेल.

## पोलीस भरती प्रक्रियेस प्रारंभ

**लातूर-** लातूर जिल्हा पोलीस दलाच्या आस्थापनेवरील पोलीस शिपाई ३० व चालक पोलीस शिपाई १६ अशा एकूण ४६ रिक्त पदांच्या भरती प्रक्रियेस बुधवारी सकाळी बाभळगाव येथील पोलीस मुख्यालय येथे मैदानी चाचणीद्वारे प्रारंभ करण्यात आला. सदर भरती प्रक्रिया २३ फेब्रुवारी २०२६ पर्यंत पार पडणार आहे.

भरती प्रक्रियेच्या पहिल्याच दिवशी सकाळी मैदानी परीक्षेस सुरुवात करण्यात आली. एकूण २१३ उमेदवार उपस्थित राहून त्यांनी विविध शारीरिक चाचण्यांमध्ये सहभाग नोंदविला. उमेदवारांची शारीरिक क्षमता व इतर आवश्यक निकषांच्या आधारे अचूक मोजमाप पध्दतीने तपासणी करण्यात आली. प्रत्येक इव्हेंटमध्ये पारदर्शकता राखण्यासाठी आवश्यक तांत्रिक साधनसामग्रीचा वापर करण्यात आला आहे.

भरती प्रक्रियेसाठी येणाऱ्या उमेदवारांच्या सोयीसुविधांचा विचार करून पोलीस प्रशासनाकडून योग्य नियोजन करण्यात आले आहे. बाहेरगावाहून येणाऱ्या उमेदवारांसाठी पिण्याच्या पाण्याची मुबलक व्यवस्था, उन्हापासून संरक्षणासाठी मंडप उभारणी, विश्रांतीसाठी स्वतंत्र जागा तसेच तत्काळ वैद्यकीय मदतीसाठी वैद्यकीय पथक तैनात करण्यात आले आहे. आपत्कालीन परिस्थितीत त्वरित उपचार मिळावेत यासाठी रुग्णवाहिकेचीही व्यवस्था ठेवण्यात आली आहे. लांबवरून येणाऱ्या उमेदवारांना रात्रीच्या वेळी रस्त्यावर किंवा उघड्यावर थांबावे लागू नये, यासाठी पोलीस मुख्यालयातील नटराज रंगमंदिर येथे निवासाची तात्पुरती व्यवस्था करण्यात आली आहे. त्याठिकाणी पिण्याचे पाणी, तात्पुरत्या स्वरूपातील स्वच्छतागृहांची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

सदर भरती प्रक्रिया पोलीस अधीक्षक अमोल तांबे आणि अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण यांच्या देखरेखीखाली पारदर्शकपणे व निष्पक्षतेने पार पाडली जात आहे. प्रत्येक इव्हेंटचे व्हिडिओ रेकॉर्डिंग व छायाचित्रण करण्यात येत असून प्रत्येक उमेदवाराची कामगिरी नोंदवहीत अचूकरीत्या नोंदवली जात आहे.

पान १ वरून

### तुम्हाला...

तुम्ही कधी येणार आहात? तुम्ही (मल्ल्या) आधीच असा युक्तिवाद केला आहे की तुम्हाला न्यायालयात प्रत्यक्ष उपस्थितीशिवाय सुनावणीचा अधिकार आहे. पण प्रथम ते स्पष्टपणे सांगणारे प्रतिज्ञापत्र दाखल करा, असे मुख्य न्यायाधीश चंद्रशेखर म्हणाले.

मल्ल्याचे वकील अमित देसाई यांनी असा युक्तिवाद केला की न्यायालयीन उदाहरणे याचिकाकर्त्याच्या प्रत्यक्ष उपस्थितीशिवाय अशा याचिकांवर सुनावणी करण्याची परवानगी देतात.या याचिकेला विरोध करताना सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी असा युक्तिवाद केला की मल्ल्याने फरार घोषित झाल्यानंतरच एफईओ कायद्यातील तरतुदींना आव्हान दिले होते.

### कोकणातील...

निश्चित केली जातील. संशोधन लेखन, जागतिक परिषदांसाठी सादरीकरणे आणि धोरणात्मक अहवाल तयार करण्याचे कामही या शाखेकडे सोपविण्यात आले आहे.

रत्नागिरी शाखा क्षेत्रीय कार्य आणि जनसहभागावर लक्ष केंद्रित करणार आहे. कातळशिल्पांचे प्रत्यक्ष स्थळी जाऊन शास्त्रोक्त सर्वेक्षण, जीपीएस आधारित नकाशांकन, ड्रोनद्वारे छायाचित्रण व व्हिडिओ दस्तऐवजीकरण ही कामे या शाखेतर्फे केली जाणार आहेत. स्थानिक परंपरा, लोककथा आणि स्थाननामांचा अभ्यास व संकलन करून सांस्कृतिक संदर्भही नोंदवले जातील. नैसर्गिक क्षरण किंवा मानवी हस्तक्षेपामुळे होणाऱ्या नुकसानीचे मूल्यमापन करून संवर्धनासाठी शिफारसी देण्याची जबाबदारीही या शाखेवर असेल. स्थानिक समुदायांशी संवाद साधून वारसा जतनासाठी जनजागृती आणि लोकसहभाग वाढविण्यावर विशेष भर दिला जाणार आहे. १४.६२ कोटींची तरतूद

प्रकल्पांतर्गत वैज्ञानिक चाचण्या आणि सहकार्यासाठी ६ कोटी ३८ लाख २२ हजार रुपये, मनुष्यबळासाठी २ कोटी ९४ लाख ६६ हजार ७९२ रुपये, उपकरणे व पायाभूत सुविधांसाठी २ कोटी ६० लाख ५० हजार रुपये आणि १० टक्के प्रशासकीय अधिभारासाठी १ कोटी ३२ लाख ९३ हजार ८७९ रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. एकूण खर्च १४ कोटी ६२ लाख ३२ हजार ६७१ रुपये इतका आहे.

या प्रकल्पाचे नियंत्रण अधिकारी म्हणून मुंबईच्या पुरातत्त्व व वस्तुसंग्रहालये संचालनालयाचे संचालक काम पाहणार असून दर सहा महिन्यांनी शासनाला प्रगती अहवाल सादर केला जाणार आहे. कोकणच्या या अमूल्य वारशाला जागतिक नकाशावर स्थान मिळवून देण्यासाठी राज्य सरकारचा हा निर्णय महत्त्वाचा टप्पा ठरणार आहे.

### काँग्रेसच्या खासदारांकडून....

व्हिडिओ क्लिप शेअर करताना, रिजिजू यांनी द वर लिहिले, ही एक बेकायदेशीर व्हिडिओ क्लिप आहे जी एका काँग्रेस खासदाराने घेतली होती जेव्हा २०-२५ काँग्रेस खासदार माननीय सभापतींच्या दालनात घुसले, त्यांना शिवीगाळ केली आणि माननीय पंतप्रधानांना धमकी दिली.

किरेन रिजिजू यांनी गुरूवारी (१२ फेब्रुवारी) नवीन व्हिडीओ शेअर केला आहे. जेव्हा काँग्रेसचे २० ते २५ खासदार लोकसभा अध्यक्षांच्या कार्यालयात गेले होते, तेव्हा बेकायदेशीरपणे काँग्रेस खासदाराने हा व्हिडीओ बनवला आहे. काँग्रेस खासदारांनी लोकसभा अध्यक्षांना शिवीगाळ केली. त्यांनी पंतप्रधान मोदींना धमकी दिली. आमचा पक्ष चर्चा आणि वादविवादावर विश्वास ठेवतो आणि खासदारांना धमक्या देण्यासाठी प्रोत्साहन देत नाही, असा गंभीर आरोप रिजिजू यांनी केला आहे.

काँग्रेस महिला खासदारांकडून गोंधळ:

मंगळवारी लोकसभेत काँग्रेस खासदारांनी आक्रमक निषेध केल्याचा व्हिडिओ शेअर केल्यानंतर रिजिजू यांनी हा व्हिडिओ शेअर केला. लोकसभेतील आतील दृश्यांमध्ये ४ फेब्रुवारी रोजी पंतप्रधान मोदी भाषण देण्याच्या काही मिनिटांपूर्वीच त्यांच्या आसनाजवळ महिला काँग्रेस खासदार जमल्याचे नाट्य दिसून आले. काँग्रेसच्या महिला खासदार पंतप्रधानांच्या आसनाजवळ जमल्या, त्यांच्या हातात एक मोठा बॅनर होता ज्यावर जो अच्छा समझो, वही करो असे लिहिले होते. विशेष म्हणजे, त्यांनी धरलेल्या बॅनरवरील मजकूर जनरल (निवृत्त) एमएम नरवणे यांच्या 'फोर स्टार्स ऑफ डेस्टिनी' या अप्रकाशित पुस्तकावर आधारित लेखातील एका वाक्याचा संदर्भ होता.

२०२० च्या भारत-चीन संघर्षावर माजी लष्करप्रमुख जनरल एमएम नरवणे यांच्या अप्रकाशित आत्मचरित्राचे वाचन करण्यास काँग्रेस नेते राहुल गांधी यांना गेल्या आठवड्यात परवानगी नाकारण्यात आल्यानंतर ही घटना घडली.

### तब्बल ७८...

या कॅबिनेट बैठकीनंतर केंद्रीय मंत्री आणि अधिकाऱ्यांसोबत पंतप्रधान साऊथ ब्लॉकपासून सेवा तीर्थला जातील. जिथे पंतप्रधान कार्यालय, कॅबिनेट सचिवालय, राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार यांचे कार्यालय आणि इंडिया हाऊस आहे. इंडिया हाऊसमध्ये उच्चस्तरीय शिष्टमंडळाचा पाहुणचार करण्यासाठी बनवलेले नवीन ठिकाण आहे. देशाच्या स्वातंत्र्यानंतर पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांच्या नेतृत्वात पहिली कॅबिनेट बैठक साऊथ ब्लॉकमध्येच झाली होती.

### आमदार अभिमन्यू...

या दुरुस्तीमुळे बंधाऱ्याच्या द्वारांतून होणारी पाण्याची गळती थांबणार असून संपूर्ण पाणीसाठा प्रभावीपणे उपलब्ध होईल. परिणामी रब्बी व उन्हाळी हंगामात सिंचनासाठी आवश्यक पाणी पूर्ण क्षमतेने उपलब्ध होणार आहे. तसेच द्वारांचे सुलभ परिचालन शक्य होऊन पूरस्थितीत बंधाऱ्याची सुरक्षितता अधिक बळकट होईल.धरण सुरक्षितता अंतर्गत किल्लारी क्र. २ बंधारा 'निर्दिष्ट धरण' म्हणून घोषित करण्यात आलेला आहे. त्यामुळे त्याच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक यांत्रिकी व विद्युत घटकांची दुरुस्ती करणे बंधनकारक आहे. मंजूर निधीमुळे ही कामे लवकरच मार्गी लागणार असल्याने किल्लारी परिसरातील शेतकरी आणि नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

सदर दुरुस्तीची कामे वेळेत पूर्ण झाल्यास सिंचन व्यवस्थेला चालना मिळून शेती उत्पादनात वाढ होण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे. आमदार अभिमन्यू पवार यांच्या पाठपुराव्यामुळे या महत्त्वाच्या प्रकल्पाला गती मिळाल्याची भावना स्थानिक नागरिकांनी व्यक्त केली आहे.या मंजुरीबद्दल मुख्यमंत्री मा. श्री देवेंद्रजी फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार, जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील तसेच लातूरचे पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांचे आमदार अभिमन्यू पवार यांनी आभार व्यक्त केले.

### धनंजय मुंडेंच्या...

उर्वरित १९ पैकी ११ वसतीगृहांसाठी जागेसह १५९ कोटी छत्तीस लाख रुपयांचा निधी राज्य शासनाने उपलब्ध करून दिला आहे. याबाबतचा शासन निर्णय सामाजिक न्याय विभागाच्या वतीने निर्गमित करण्यात आला आहे.

ऊसतोड कामगारांच्या मुलांच्या हातात भविष्यात कोयत्याच्या ऐवजी वही, पुस्तक आणि पेन यावेत असे स्वप्न उराशी बाळगून धनंजय मुंडे यांनी सामाजिक न्याय मंत्री असताना संत भगवान बाबा शासकीय वसतीगृह योजनेची घोषणा करत सुरुवात केली होती. त्या अंतर्गत ऊसतोड कामगारांची सर्वाधिक संख्या असलेल्या राज्यातील ४१ तालुक्यांमध्ये ८२ वसतीग्रह सुरू करण्याची घोषणा धनंजय मुंडे यांनी करून बीड जिल्ह्यातील सर्व ११ तालुक्यांमध्ये प्रत्येकी दोन याप्रमाणे २२ वसतीग्रहे भाड्याच्या जागेत सुरू केली होती.

दरम्यान यापैकी तीन वसतीगृहे ही स्वतःच्या जागेमध्ये उभारण्यासाठी निधी उपलब्ध करून देण्यात आला असून आता आणखी उर्वरित १९ पैकी ११ वसतीगृहांसाठी निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. यामध्ये परळी सह पाटोदा, गेवराई, केज, माजलगाव या तालुक्यातील प्रत्येकी दोन तर बीड तालुक्यातील एक वसतिगृह उभारले जाणार आहे. तर प्रयत्न वसतिगृह उभारणीसाठी सुमारे १४ कोटी ५५ लाख रुपये इतका निधी खर्च केला जाणार आहे.

अजितदादांचा शब्द अन् मुंडेंची कृतज्ञता:

काही दिवसांपूर्वी बीड जिल्हा दौऱ्यावर असताना बीड जिल्ह्याचे पालकमंत्री दिवंगत नेते अजित पवार यांनी बीड येथे आयोजित एका ऊसतोड कामगारांच्या मेळाव्यामध्ये धनंजय मुंडे यांनी आजपर्यंत ऊसतोड कामगारांसाठी केलेल्या कामाचे कौतुक करतानाच संत भगवान बाबा शासकीय वसतीगृह योजनेतून सर्व ११ तालुक्यांमध्ये बावीस वसतीगृह ही स्वतःच्या जागेत उभारून देऊ व त्यासाठी निधीची कमतरता भासू देणार नाही असा शब्द दिला होता, तो शब्द आता पूर्णत्वाकडे जात असून धनंजय मुंडे यांनी अजितदादा पवार यांची आठवण काढत त्यांच्या प्रति कृतज्ञता व्यक्त करत राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांचेही आभार व्यक्त केले आहेत.

### पुतिन सरकारकडून...

क्रेमलिनचे प्रवक्ते दिमित्री पेसकोव यांनी स्पष्ट केले की, व्हॉट्सअ‍ॅपला रशियात कार्यरत राहायचे असल्यास देशाच्या कायद्यांचे पालन करणे आवश्यक आहे. त्यांनी सांगितले की मेटा (Meta) चर्चा आणि नियमांचे पालन करण्यास तयार असेल तरच यावर काही तोडगा निघू शकतो.

रशियाची संचार नियामक संस्था रोसकोमनादजोरने व्हॉट्सअ‍ॅपला आपल्या अधिकृत सेवा नोंदणी यादीतूनही काढून टाकले आहे. रशियन अधिकाऱ्यांचा आरोप आहे की परदेशी तंत्रज्ञान कंपन्या स्थानिक कायद्यांचे पालन आणि डेटा शेअरिंगबाबत सहकार्य करत नाहीत.

हा निर्णय सुरक्षा आणि फसवणूक रोखण्याच्या दृष्टीने महत्त्वाचा मानला जात आहे.

### लातुरात अखिल...

शैक्षणिक सहाय्य योजनेत कोणताही बदल न करता त्या पूर्ववत चालू ठेवावे आदी मागण्या मोर्चाद्वारे करण्यात आल्या. लातूर शहरातील लोकशाहीर अण्णाभाऊ साठे चौक येथून अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्याला अभिवादन करून मोर्चाला वाजत गाजत सुरुवात झाली. त्यानंतर मोदी सरकारच्या विरोधात घोषणा देत गंजगोलाई, महात्मा गांधी चौक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा, छत्रपती शिवाजी महाराज चौक मार्गे जुने जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा धडकला. कामगार नेते राजकुमार होळीकर, लेबर युनियचे नेते सुधीर देशमुख, बसवंतआपा उबाळे, प्रा. सुधीर अनवले, इंजि. शफी शेख यांची भाषणे झाली. त्यानंतर मोर्चाच्या शिष्ठमंडळाने नवीन जिल्हाधिकारी येथे जाऊन जिल्हाधिकाऱ्यांना मागण्यांचे निवेदन सादर केले.

हा मोर्चा यशस्वी करण्यासाठी संघटनेचे उपाध्यक्ष सुरेश काटे, सचिव शिवाजी भंडारे, इंजि. शफी शेख, लातूर तालुकाद्यक्ष अंकुश टकळगे, शहर सचिव महेंद्र कांबळे, प्रमोद बानाटे, बळीराम कांबळे, किशोर सगर, मंगळताई शिंदे, नूतन अंगरखे, अनिता काकरे, चंद्रपाल गिरी, भागवत पांचाळ व इतर पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

### देवस्थान समिती...

महानगरपालिका व पोलिस प्रशासनाने तात्काळ आवश्यक त्या उपाय योजना सुरु कराव्यात असे सांगितले. मंदीर परिसरात स्वतंत्र पोलिस कक्ष स्थापन करून त्या ठिकाणी ध्वनीनिक्षेपक व धोक्याची सूचना देणारी यंत्रणा सज्ज करावी. गर्दीचे योग्य नियोजन करण्यासाठी रांग व्यवस्था योग्य प्रकारे करून या ठिकाणी देवस्थानच्या वतीने स्वयंसेवक नेमावे अशी सूचना करण्यात आली.

महापालिका प्रशासनाने मंदीराकडे जाणाजया सर्व प्रमुख मार्गाची तत्काळ दुरुस्ती करून सुरक्षेच्या दृष्टीने पथदिवे तातडीने सुरु करावेत, अशी सूचना करून यात्रा महोत्सव परिसरात आरोग्य यंत्रणा व रुग्णवाहिका सज्ज ठेवावी, असे केशव नेटके यांनी सांगितले. यात्रा महोत्सवादरम्यान परिसरात स्वच्छता ठेवण्यासाठी मनपा प्रशासनाने विशेष लक्ष देवून याठिकाणी स्वच्छता पथक तैंनात करण्याची सूचनाही देण्यात आली. यात्रा महोत्सवात जे खाद्य पदार्थाचे स्टॉल उभारले जातात त्या ठिकाणी कोणतीही भेसळ होणार नाही याची दक्षता घेवून तेथील खाद्य पदार्थाचे नमुने वेळोवेळी घेवून अन्न औषध प्रशासनाने त्याची तपासणी करावे, असेही सूचना करण्यात आले. कृषी व पशुसंवर्धन विभागाच्या वतीने करण्यात येणाजया प्रदर्शाची अधिकाधिक प्रसिध्दी करून या माध्यमातून शेतकजयांमध्ये जनजागृती करण्यात यावी, अशी सूचना यावेळी करण्यात आली.

देवस्थानच्या वतीने ज्येष्ठ विश्वस्त विक्रम गोजमगुंडे यांनी काही अडचणी मांडल्या. त्या अडचणी सोडविण्यासाठी तात्काळ उपाय योजना करण्यात यावे, असे निर्देश अतिरिक्त जिल्हाधिकारी नेटके यानी दिले. यावेळी देवस्थानच्या वतीने यात्रेच्या पहिल्या दिवशी जिल्हाधिकारी यांच्या हस्ते होणारे ध्वजारोहन व महाभिषेक यासाठी निमंत्रित करण्यातआले आहे. यावेळी पोलिस, आरोग्य, महानगरपालिका, जिल्हा परीषद, बांधकाम विभाग, महावितरण, अन्न व औषध प्रशासन आदी विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

Printed by, Owned by, Published by & Edited by GANGADHAR ABHANG DIGOLE , Printed by GHONE NARASHINHA PANDURANG, Printed at Magic Publication, Shop No.10, MANAPA SHOPING COMPLEX, GANDHI CHOWK, LATUR, Tq.& Dist. LATUR - 413512 & Published at H.No.255, Shri SAI SCHOOL NEAR, Sona Nagar, Barshi Road, LATUR, DIST- LATUR-413512 Tq.& Dist. PARBHANI - 431401 MAH. Editor : GANGADHAR ABHANG DIGOLE RNINO.MHMAR/25/A1409

हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक- गंगाधर अभंग डिगोळे यांचे करीता घोणे नरसिंह पांडूरंग यांनी मॅजिक पब्लीकेशन, शॉप नं. १० मनपा शॉपिंग कॉम्पलेक्स, गांधी चौक, लातूर - ४१३५१२ येथे छापून कार्यालय घर नं. २५५, श्री साई स्कूल निअर सोना नगर, बार्शी रोड, लातूर, ता. जि. लातूर . - ४१३५१२, येथे प्रकाशित केले. संपादकः गंगाधर अभंग डिगोळे मो.९४०५२९५२०, ९०२८८४५२३३ RNINO.MHMAR/25/A1409

# शक्तिपीठ महामार्गासाठी शेतकऱ्यांवर होत असलेली जबरदस्ती व दडपशाही तात्काळ थांबवावी

## रेणापूर तालूका काँग्रेस कमिटीचे माजी आमदार धिरज देशमुख यांच्या सुचनेनुसार तहसीलदारांना निवेदन

रेणापूर :-- लातूर जिल्ह्यात प्रस्तावित शक्तिपीठ महामार्ग प्रकल्पाच्या अनुषंगाने लातूर तालुक्यातील मोरवड तसेच रेणापूर, औसा तालुक्यातील कवठा केज, नाहोली भेटा, अंधोरा यासह अन्य गावांमध्ये प्रशासनाकडून शेतकऱ्यांच्या जमिनीची मोजणी जबरदस्तीने करण्याचा प्रयत्न सुरू असल्याच्या तक्रारी प्राप्त होत आहेत.ही बाब लक्षात घेऊन माजी आमदार तथा जिल्हा बँकेचे अध्यक्ष धिरज विलासराव देशमुख यांच्या सुचनेनुसार रेणापूर तालूका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष प्रमोद कापसे व शिष्टमंडळाने रेणापूर तहसीलदार यांची भेट घेवून निवेदन देवून शेतकऱ्यांना नाहक त्रास देवूनये अशी मागणी केली.



निवडणुकांच्या काळात थांबलेली ही प्रक्रिया निवडणुका संपताच अचानक वेगाने सुरू करण्यात आली असून त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये तीव्र संताप व अस्वस्थता निर्माण झाली आहे.

शक्तिपीठ महामार्ग बाधित संघर्ष समितीतील गजेंद्र येळकर, बालाजी हाके पाटील, दिलीप कुलकर्णी, विजय कुलकर्णी व इतर कार्यकर्त्यांना रेणापूर पोलीस स्टेशनमार्फत प्रतिबंधात्मक नोटिसा बजावण्यात आल्या आहेत. सोबतच विविध गावांतील शेतकऱ्यांनाही देखील नोटिसा पाठवून दबाव टाकण्यात येत आहे. कोणतीही सविस्तर चर्चा, योग्य मोबदल्याची हमी, लेखी आश्वासन किंवा पारदर्शक प्रक्रिया न राबविता मोजणी लादली जात असल्याची बाब गंभीर आहे.

महामार्ग प्रकल्पाच्या नावाखाली शेतकऱ्यांच्या जमिनी जबरदस्तीने संपादित करण्याचा प्रयत्न लोकशाही तत्वांना धरून नाही. प्रशासनाने संवादाचा मार्ग स्वीकारण्याऐवजी पोलिसी दबावाचा अवलंब केल्यास सामाजिक तणाव वाढण्याची शक्यता आहे. शेतकरी आधीच नैसर्गिक आपत्ती, वाढता उत्पादन खर्च व बाजारभावातील अनिश्चितता यामुळे अडचणीत आहेत. अशा परिस्थितीत त्यांच्यावर अतिरिक्त मानसिक व प्रशासकीय दबाव टाकणे अन्यायकारक आहे.

शेतकऱ्यांवरील जबरदस्तीची मोजणी व पोलिसी कारवाई तात्काळ थांबवावी. संबंधित गावांमध्ये प्रशासन, लोकप्रतिनिधी व शेतकरी यांच्यात खुली व पारदर्शक चर्चा आयोजित करावी.

शेतकऱ्यांवरील प्रतिबंधात्मक नोटिसांचा पुनर्विचार करून अन्यायकारक कारवाई मागे घ्यावी अन्यथा तिव्र आंदोलन काँग्रेस पक्षाकडून केले जाईल असे रेणापूर तालूका काँग्रेस कमिटी कडून देण्यात आलेल्या निवेदनात म्हटले आहे. यावेळी गोविंद पवार, शहर अध्यक्ष पदम पाटील, माने केशव, प्रकाश पाटील, उमाकांत खलंग्रे सभापती लतीफ शेख, रमेश शिंदे, सचिन इंगळे, संतोष शिंदे,बालाजी हाके, किरण पवार, ॲड. तानाजी कणसे, दिनेश पाटील, चंद्रकांत कातळे, सचिन मोटेगावकर, ॲड मुरलीधर पडोळे, मुकुंद सूर्यवंशी, दिग्विजय पाटील, प्रदीप काळे, आब्रिश भिसे, ज्ञानेश्वर कुसुंबे,राजकुमार कांबळे, राहुल पाटील, ॲड शिरगिरे, बिभीषण कदम, कल्याण शाहीर, दीपक जगदाळे आदींची उपस्थिती होती.



# माधव बावगे यांना 'बाबा आमटे सामाजिक कार्यकर्ता राष्ट्रीय पुरस्कार'

लातूर, दि.१२- १९८५ साली बाबा आमटे यांची भारत जोडो यात्रा निघाली नसती, तर देशात मोठा सामाजिक कलह निर्माण झाला असता. आज हिंदू-मुस्लिम द्वेष ज्या वेगाने वाढतो आहे, त्या पाश्वभूमीवर बाबांच्या विचारांची पुन्हा नितांत गरज आहे, असे ठाम प्रतिपादन ज्येष्ठ पत्रकार व माजी खासदार कुमार केतकर यांनी केले. बाबा आमटे यांच्या मानवतावादी विचारांचा वारसा पुढे नेणाऱ्या मबाबा आमटे एकता अभियानफ तर्फे आयोजित राष्ट्रीय पुरस्कार वितरण सोहळ्यात ते बोलत होते. मुंबईत पार पडलेल्या या कार्यक्रमात सामाजिक सलोखा, विवेकवाद आणि माणुसकी जपण्याचा ठाम संदेश देण्यात आला.

या दिमाखदार सोहळ्यात कोलकात्याचे प्रसिद्ध सामाजिक कार्यकर्ते व भारत जोडो अभियानाचे वरिष्ठ संयोजक श्री. ओ. पी. शहा (कोलकता) यांना मबाबा आमटे जीवनगौरव राष्ट्रीय पुरस्कार-२०२६फ तर महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे अध्यक्ष आणि विवेकवादी चळवळीचे अग्रणी कार्यकर्ते श्री. माधव बावगे (लातूर) यांना मबाबा आमटे सामाजिक कार्यकर्ता राष्ट्रीय पुरस्कारफ प्रदान करून गौरविण्यात आले. या सोहळ्याला विचार पिठावर ज्येष्ठ पत्रकार व माजी खा. कुमार केतकर, ख्यातनाम विधी तज्ज्ञ मानवाधिकार कार्यकर्ते ॲड. असीम सरोदे यांची प्रमुख उपस्थिती लाभली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी एबीपी माझाच्या संपादक सरिता कौशिक होत्या सह प्रा डॉ. सोमनाथ रोडे, डॉ अशोक बेलखोडे आदी नामवंत मान्यवरांच्या हस्ते पुरस्कारांचे वितरण झाले. या राष्ट्रीय पुरस्काराचे स्वरूप एक लक्ष रुपये रोख, शाल, सन्मानपत्र आणि स्मृतिचिन्ह असे होते. माधव बावगे यांनी पुरस्काराची रक्कम ५० हजार रूपये भारत जोडो युवा अकादमी या संस्थेला सुपूर्द केली आहे. कार्यक्रमाला सामाजिक चळवळीतील कार्यकर्ते, विचारवंत, पत्रकार, विद्यार्थी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पुरस्कार स्वीकारल्यानंतर आपल्या मनोगतात ओ. पी. शहा यांनी अत्यंत भावुक शब्दांत बाबा आमटेंशी असलेले नाते उलगडले. ते म्हणाले, जर बाबा आमटे मला भेटले नसते, तर कदाचित मी सामाजिक कार्याच्या या वाटेवर आलोच नसतो. बाबांनी भारत जोडोची संकल्पना माझ्या मनात रुजवली. आज मी वेगवेगळ्या देशांमध्ये सामाजिक कार्य करत असलो, तरी त्या कामाच्या मुळाशी बाबांचीच प्रेरणा आहे.

पुरस्काराला उत्तर देताना ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते माधव बावगे म्हणाले, हा पुरस्कार माझा वैयक्तिक नाही, तर माझ्यासोबत अंधश्रद्धा निर्मूलन आणि सामाजिक समतेसाठी रस्त्यावर उतरलेल्या प्रत्येक कार्यकर्त्याचा आहे. आम्ही बाबा आमटे यांच्यासोबत अनेक वर्षे काम केले. त्यांच्या विचारांची प्रेरणा घेऊन राज्यभर वेगवेगळ्या विषयांवर चळवळ उभी केली. त्या कार्याला समाजाकडून मोठा प्रतिसाद मिळाला आणि त्यातून दीर्घकाळ टिकणारे समाजकारण उभे राहिले. या पुरस्कारामुळे विज्ञाननिष्ठ, विवेकी समाज घडवण्याच्या आमच्या लढ्याला नवी ऊर्जा मिळाली आहे. ॲड. असीम सरोदे यांनी आपल्या भाषणातून सध्याच्या सामाजिक परिस्थितीवर तीव्र शब्दांत भाष्य केले.

यावेळी उपाध्यक्ष डॉ. सोमनाथ रोडे, सचिव डॉ. अशोक बेलखोडे, सहसचिव नफिसा कोलंबोवाला, कोषाध्यक्ष गिरीश पदमावार यांच्यासह संस्थेचे राष्ट्रीय प्रतिनिधी, जेकब नेल्लीथानम, अनिल हेब्बर, विजय भारतीया, सुजाता राऊत आदी मान्यवर उपस्थित होते.

# शिवलिंगेश्वर फार्मसी कॉलेज ११ व्या राज्यस्तरीय फार्मा व्हॉली कप विजेता



औसा (प्रतिनिधी)- आलमला येथील शिवलिंगेश्वर कॉलेज ऑफ फार्मसी व दगडोजीराव देशमुख डी. फार्मसी यांच्या संयुक्त विद्यमाने दरवर्षी प्रमाणे याही वर्षी विश्वेश्वर संकुलात पार पडलेल्या ११ व्या राज्यस्तरीय आंतर महाविद्यालयीन फार्मा व्हॉली कप २०२६ या स्पर्धे ची अंतिम लढत शिवलिंगेश्वर कॉलेज ऑफ फार्मसी, आलमला व डीबी ग्रुप कॉलेज ऑफ फार्मसी महाळंग्रा यांच्या मध्ये होऊन चुरसीच्या व अटीतटीच्या सामन्यात शिवलिंगेश्वर कॉलेज ऑफ फार्मसी, आलमला कॉलेजने प्रथम पारितोषिक पटकावले. डीबी ग्रुप कॉलेज ऑफ फार्मसी महाळंग्रा यांनी द्वितीय पारीतोषिक तर पाथरीचा डीजेपीएस फार्मसी संघ यांनी तृतीय पारितोषिक मिळविले. खेळाडूंच्या व्हॉलीबॉल कौशल्याला उपस्थित विद्यार्थी, कर्मचारी व यु-टयुब लाईव्ह द्वारे थेट प्रेक्षेपण पाहणाऐया क्रीडा रसिकांनी भरभरुन दाद दिली.

शिवलिंगेश्वर कॉलेज ऑफ फार्मसी, आलमला येथील भव्य मैदानात दोन दिवस रंगलेल्या राज्यस्तरीय स्पर्धे चे बक्षीस वितरण बाबसाहेब माणिकराव ठोंबरे,अधिष्ठाता,कृषी महाविद्यालय, लातूर, निवृत्त वन अधिकरी शिवाजी गिरी, संस्थेचे सचिव बसवराज धाराशिवे, सहसचिव महादेव खिचडे, राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त सय्यद रहेमान, विश्वेश्वरय्या इन्स्टीटयुट ऑफ इंजिनिअरींग ॲन्ड टेक्नॉलॉजी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रशांत धाराशिवे, डॉ.कैलास कापसे, डॉ. जयदीप यादव, प्रा.दिनेश गुजराथी, डॉ. समीर शफी, डॉ. सचिन हंगरगेकर, डॉ. अजय फुगटे, वागदरे एस.एस. यांच्या शुभहस्ते व सांयटिफीक सेल्स लातूर, शैलेश ईलेक्ट्रीकल लातूर, महालक्ष्मी प्लायलॅम लातूर, सिध्देश्वर सर्विसेस औसा, बोरा युनिफॉर्मस लातूर, नक्षत्र ग्लास ॲन्ड ॲल्युमिनीयम लातूर, प्राची डिजीटल लातूर, आपली कॅन्टीन आलमला, विश्वेश्वरय्या झेरॉक्स आलमला या प्रायोजकांच्या वतीने रोख रक्कम, ट्रॉफी व प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले.

अधिष्ठाता बाबासाहेब ठोंबरे, संस्थेचे सचिव बसवराज धाराशिवे व उपस्थित मान्यवरांनी विजयी संघास व सबंध महाराष्ट्रातून स्पर्धेमध्ये सहभागी झालेल्या संघास शुभेच्छा देऊन कौतुक केले.

स्पर्धेमध्ये उत्कृष्ट शिस्तबध्द संघाचे पारितोषिक सरस्वती कॉलेज ऑफ फार्मसी हिंगोली, बेस्ट लिफ्टर शिवलिंगेश्वर कॉलेज ऑफ फार्मसी संघाचा कर्णधार योगेश सावंत, बेस्ट स्मॅशर म्हणुन डीजेपीएस कॉलेज ऑफ फार्मसी पाथरी चा उदय गवळी तर प्लेयर ऑफ द टुर्नामेंटचे पारितोषिक डीबी ग्रुप कॉलेज ऑफ फार्मसी महाळंग्रा च्या अभय धोत्रे यांनी पटकावाले, या सर्वांना ट्रॉफी व प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. स्पर्धेस पंच म्हणुन उपस्थित असलेले दिपक पाटील, सोमनाथ पाटील, विजय हांडे, सुनिल मुनाळे, पाशाभाई लंगडे व समालोचक महादेव मिरकले यांचा शाल व ट्रॉफी देऊन सत्कार करण्यात आला.

कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पाडण्याकरीता स्पर्धेचे समन्वयक प्रा. गणेश गोसावी, बालाजी विभुते, युवराज काटु, विकास मुगळे, किरण रोडगे, डॉ. प्रसाद कटारे, कापसे विद्या, मयुरी चंद्रवंशी, सय्यद अझिम, सिरगिरे कविता, गोपाळ माळी, गौरी परतकर, अजहर ठेंगाडे सर्व प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी यांनी अथक परीश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. सुरज मालपाणी यांनी मानले.

## 'वेताळेश्वर'चे 'युवा रंग' वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात

**औसा, दि.१२-** येथील श्री वेताळेश्वर शिक्षण संस्था संचलित विविध शैक्षणिक संस्थांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'युवा रंग - २०२६' हे वार्षिक स्नेहसंमेलन मोठ्या उत्साहात पार पडले.

उद्घाटन उमरगा विधानसभा मतदारसंघाचे आमदार प्रवीण स्वामी यांच्या हस्ते दीप प्रज्ज्वलनाने करण्यात आले. यावेळी जिल्हा कोषागार अधिकारी उज्ज्वला पाटील, राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश सचिव बबन भोसले, रमाकांत घाडगे, संतोष मेदगे यांच्यासह संस्थेचे अध्यक्ष भीमाशंकर बावगे, उपाध्यक्ष जयदेवी बावगे, सचिव वेताळेश्वर बावगे, संचालक नंदकिशोर बावगे व संचालिका डॉ. माधुरी बावगे आदी उपस्थित होते. प्रास्ताविक सचिव वेताळेश्वर बावगे यांनी केले. स्नेहसंमेलनाच्या निमित्ताने विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव देण्यासाठी नृत्य, गायन, समूह नृत्य, नाटक आदी सांस्कृतिक कार्यक्रम सादर करून उपस्थितांची दाद मिळविली. कार्यक्रमास प्राचार्या योगिता बावगे, प्राचार्य डॉ. श्रीनिवास बुमरेला, प्राचार्य डॉ. नितीन लोणीकर, प्राचार्य माधव सोनवरे, प्राचार्या रुपाली गिरी, प्राचार्य आनंद शेंडगे, प्रा. शुभम वैरागकर यांच्यासह संस्थेतील सर्व प्राचार्य, शिक्षक, कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

## पुणे यांच्यावतीने आयोजित विभागस्तरीय विद्यार्थी समूहगीत गायन स्पर्धेत केशवराज विद्यालयाचा तृतीय क्रमांक

लातूर, दि.११ फेब्रुवारी : मातृ मंदिर विश्वस्त संस्था निगडी, पुणे यांच्यावतीने आयोजित विभागस्तरीय विद्यार्थी समूहगीत गायन स्पर्धेत केशवराज माध्यमिक विद्यालयाने तृतीय क्रमांक प्राप्त केला असून या समूह गीत गायन स्पर्धेसाठी विद्यालयास १५०० रुपयांचे रोख पारितोषिक जाहीर करण्यात आले आहे. ही स्पर्धा विद्यालयात ०३ जानेवारी रोजी विद्यालयात घेण्यात आली होती. या स्पर्धेत आठवी ते दहावी विभागातील एकूण १६२१ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. या विद्यार्थ्यांना विद्यालयातील संगीत शिक्षक संतोष बीडकर यांनी मार्गदर्शन केले होते.

या समूहगीत गायन स्पर्धेत सहभागी सर्व विद्यार्थ्यांचे व त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकांचे या यशाबद्दल भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे अध्यक्ष डॉ. सुरेंद्रजी आलूरकर, कार्यवाह डॉ. हेमंत वैद्य, मुख्य प्रशासकीय समन्वयक प्रा. चंद्रकांत मुळे, केंद्रीय कार्यकारिणी सदस्य प्रवीण सरदेशमुख, जितेश चापसी, संजय गुरव, स्थानिक समन्वय समितीचे अध्यक्ष धनंजय तुंगीकर, कार्यवाह शैलेश कुलकर्णी, माध्यमिक शालेय समितीचे अध्यक्ष गंगाधर खेडकर, विद्यालयाचे मुख्याध्यापक बालासाहेब केंद्रे, केंद्रीय विद्यासभा संयोजक तथा उपमुख्याध्यापक महेश कस्तुरे, पर्यवेक्षक राजश्री कुलकर्णी, इंदू ठाकूर, अंजली निर्मळे, राम जोशी, धनंजय कुलकर्णी तसेच विद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेर कर्मचारी यांनी अभिनंदन केले आहे.

# वृद्ध कलावंतांचे मानधन ३ वर्षांपासून अडवले; सीईओ दालनात ठिय्या आंदोलनाचा इशारा

लातूर : राजर्षी शाहू महाराज वृद्ध साहित्यिक व कलावंत मानधन योजनेंतर्गत वृद्ध कलावंतांना देण्यात येणारे मानधन सन २०२१-२२, २०२२-२३ व २०२३-२४ या तीन वर्षांचे मानधन जिल्हा प्रशासनाकडून देण्यात न आल्याने वृद्ध कलावंतांचे हाल होताहेत. तेंव्हा वृद्ध कलावंतांचे मानधन का रोखण्यात आले याची प्रशासनाच्या वतीने योग्य ती चौकशी करून वृद्ध कलावंतांना लवकरात लवकर न्याय द्यावा, अन्यथा हे सर्व वृद्ध कलावंत जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या दालनात ठिय्या आंदोलन करतील असा इशारा, उपजिल्हाधिकारी, जि. प. चे मुख्य कार्यकारी अधिकारी यांना देण्यात आलेल्या निवेदनाद्वारे देण्यात आला आहे. दरम्यान, वृद्ध कलावंतांच्या वतीने आज पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनाही आपल्या मागण्यांचे निवेदन देण्यात आले.



जिल्हाधिकारी तथा समिती अध्यक्षा यांच्या आदेशानुसार ७ ते ९ ऑक्टोबर २०२४ दरम्यान पात्र वृद्ध कलावंतांच्या मुलाखती व सादरीकरण प्रक्रिया पूर्ण करण्यात आली होती. मात्र त्यानंतर १४ ते १५ महिने उलटूनही निवड यादी जाहीर न होणे, हे केवळ प्रशासकीय दिरंगाई नसून थंड डोक्याने राबवलेली अमानवी उदासीनता असल्याचा आरोप कलावंतांनी केला. हे संपूर्ण कामकाज जिल्हा परिषद पंचायत विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी बाळासाहेब वाघ यांच्याकडे असताना, गेल्या दीड वर्षांपासून वृद्ध कलावंतांना खोटी कारणे देऊन त्यांना मानधनापासून दूर ठेवले जात आहे. त्यात कधी अशासकीय सदस्यांचे एकमत होत नाही, कधी शासनाचे परिपत्रक बदलले, कधी हे जुने प्रकरण माझे नाही, तर कधी आमदारांचे पत्र आले आहे, अशी उत्तरे देत वृद्ध कलावंतांना मानधन दिले जात नाही,असाही आरोप निवेदनाद्वारे करण्यात आला आहे.

या योजनेतील बहुतेक कलावंत हे ७०-८० वर्षांचे, विविध आजारांनी ग्रस्त, उपचारासाठी पैसे नसलेले आहेत. अनेकांचे जीवन हे केवळ या मानधनावर अवलंबून आहे. मात्र जि.प. प्रशासनाच्या निष्क्रियतेमुळे त्यांना उपासमार, मानसिक छळ आणि अपमानास्पद प्रतीक्षा सहन करावी लागत आहे. विशेष म्हणजे यातील बहुतांश कलावंत हे मागासवर्गीय, असंघटित, अशिक्षित लोककलावंत, तमाशा कलावंत, वादक, गायक असून, शासनाच्या नावाने त्यांच्यावर अन्याय केला जात असल्याचा संताप व्यक्त होत आहे.

तीन वर्षांचे प्रलंबित प्रकरण तातडीने निकाली काढले नाही, तर लातूर जिल्ह्यातील सर्व कलावंत, जिल्हा परिषदेचे नूतन सदस्य यांच्यासह मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या दालनात ठिय्या आंदोलन करतील असा इशारा शाहीर सुभाष साबळे, शाहीर वामन हजारे, शाहीर बळीराम घोगरे, शाहीर सुलचंद माळी, मारोतीराव पाटील, दिनकर येडुळे, दिनेश ढोबळे, नवनाथ महाराज म्हेत्रे, शाहीर उत्तम कांबळे, शाहीर धम्मपाल सावंत, लोककलावंत संजय मुंडे, शाहीर अशोक कांबळे, तमाशा कलावंत प्रल्हाद सुरवसे व भीम गायिका जयश्री कांबळे यांनी निवेदनाद्वारे दिला आहे.

# कचरामुक्तीसाठी आमचं ग्रीन लातूर वृक्ष फाऊंडेशनचा २४४७ दिवसांचा मूक लढा

लातूर : प्रतिनिधी- लातूर शहर स्वच्छ, सुंदर आणि हरित व्हावे, ही केवळ घोषणा न ठेवता ती प्रत्यक्षात उतरवण्याचे काम गेल्या साडेसहा वर्षांपासून अखंड २४४६ दिवस आमचं ग्रीन लातूर वृक्ष फाउंडेशन नि:स्वार्थपणे करत आहे. 'कचरा मुक्त लातूर हे स्वप्न साकारण्यासाठी फाउंडेशनने सुरू केलेला हा सामाजिक लढा आज शहरासाठी प्रेरणादायी ठरत आहे.

वृक्ष लागवड व वृक्ष संगोपना सोबतच शहर स्वच्छतेसाठी सुरू असलेल्या या अभियानात मागील साडेसहा वर्षांत तब्बल १२४ ठिकाणी स्वच्छता मोहिमा राबवण्यात आल्या आहेत. या सर्व मोहिमांची तारीख व ठिकाणानुसार सविस्तर यादी जाहीर करण्यात आलेली असून, हे कार्य केवळ आकडेवारीपुरते मर्यादित नसून त्यामागे समाजाप्रती असलेली जबाबदारीची भावना स्पष्टपणे दिसून येते. लातूर शहरातील सर्व प्रमुख दुभाजक (डिव्हायडर) ग्रीन लातूर वृक्ष फाउंडेशनच्या सदस्यांद्वारे वारंवार स्वच्छ करण्यात आलेले आहेत. विशेषत: पावसाळ्यात दुभाजकांमध्ये वाढलेले गवत काढून ते स्वच्छ ठेवण्याची जबाबदारी फाउंडेशनच्या सदस्यांनी सातत्याने पार पाडली आहे.



याशिवाय शहरातील विविध ग्रीन बेल्ट, मंदिरे, सार्वजनिक ठिकाणे तसेच मोकळे प्लॉट येथे साचलेला कचरा काढून स्वच्छता करण्यात आली. अनेक ठिकाणी वर्षानुवर्षे कच-याचे ढीग असलेली ठिकाणे आज स्वच्छ व देखणी दिसत आहेत. विशेष सामाजिक उपक्रमांतर्गत 'भित्तीपत्रके मुक्त लातूर' ही मोहिम राबवण्यात आली. शहरातील अनेक भिंतींवर बेकायदेशीररीत्या चिकटवलेली जाहिरातीची पत्रके काढून भिंती स्वच्छ करण्यात आल्या, ज्यामुळे शहराच्या सौंदर्यात लक्षणीय बदल झाला. कोविड काळाच्या अगोदर खाडगाव स्मशानभूमीची प्रत्येक सोमवारी नियमित स्वच्छता करण्याचा उपक्रम ग्रीन लातूर वृक्ष फाउंडेशनच्या सदस्यांनी सुरू ठेवला होता. तसेच शहरातील मध्यवर्ती बस स्थानकांची स्वच्छता मोहीमदेखील आमचं ग्रीन लातूर वृक्ष फाऊंडनेश च्या सदस्यांनी यशस्वीपणे पार पाडली. एवढेच नाहीतर सार्वजनिक ठिकाणी पान, सुपारी, मावा खाऊन थुकणा-या जनते करिता पोष्टर्सद्वारे जनजागृती सुद्धा केली जाते. आपल्याकडे प्रतिवर्षी गणेशोत्सव मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. अनंतचतुर्दशी दिवशी गणरायाच्या विसर्जनासाठी विहिरी व नद्यांकडे मोठी गर्दी होत असते. मात्र यामुळे पाण्याचे प्रदूषण व निर्माल्यांच्या प्लास्टिक पिशव्यांमुळे पर्यावरणाला मोठा धोका निर्माण होतो. ही बाब लक्षात घेऊन आमचं ग्रीन लातूर वृक्ष फाऊंडेशनच्या सदस्यांनी शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी निर्माल्य संकलन केंद्र उभारले तसेच ताडपत्रीचा वापर करून पर्यावरणपूरक हौद प्रतिवर्षी तयार केला जातो. याच हौदामध्ये गणेशमूर्ती विसर्जन करण्याचे आवाहन लातूरकरांना केले जाते. प्रतिवर्षीच या उपक्रमाला नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत मोठ्या संख्येने सहभाग नोंदवतात.

आज या सर्व कार्यामुळे सामान्य लातूरकर ग्रीन लातूर वृक्ष फाउंडेशनच्या कार्याचे मनापासून कौतुक करत आहेत. कोणतीही प्रसिद्धी, आर्थिक लाभ किंवा राजकीय पाठबळ न घेता सुरू असलेले हे कार्य शहरातील नागरिकांना स्वच्छतेसाठी पुढे येण्याची प्रेरणा देत आहे. शहर बदलायचे असेल तर आधी सवय बदलावी लागते हा संदेश प्रत्यक्ष कृतीतून देणारे आमचं ग्रीन लातूर वृक्ष फाउंडेशन आज कचरामुक्त लातूरचा पाया मजबूत करत आहे.

# आमदार कराड यांच्या हस्ते नूतन सदस्यांचा सत्कार




लातूर/ प्रतिनिधी- लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील भारतीय जनता पार्टीच्या नवनिर्वाचित जिल्हा परिषद आणि पंचायत समिती सदस्यांचा भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

लातूर ग्रामीण विधानसभा मतदारसंघात भातांगळी जिल्हा परिषद गटातून महादेव साळुंके, खरोळा गटातून सौ. शिवकन्या महेंद्र गोडभरले, भादा गटातून सौ. छायाबाई पद्माकर चिंचोलकर तसेच भातांगळी पंस गणातील पांडुरंग बालवाड, कामखेडा गणातील शरद दरेकर, शिवली गणातील सौ. प्रणिता राजकिरण साठे आणि बोरी गणातील सौ. सिंधुताई खुरदळे यांनी विजय मिळविला.

भाजपा लातूर मंडळाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या या सत्कार समारंभात भाजपा नेते आ. रमेशआप्पा कराड यांच्या हस्ते भाजपाचे नवनिर्वाचित जिल्हा परिषद आणि पंचायत समिती सदस्यांचा यथोचित सत्कार करून पुढील कार्यासाठी शुभेच्छा देण्यात अल्या. प्रारंभी भाजप नेते आ. रमेशआप्पा कराड यांचा मंडल अध्यक्ष प्रताप पाटील आणि सुरज शिंदे यांनी सत्कार केला.

याप्रसंगी भातांगळी जिप गटातील महादेव साळुंके, खरोळा जिप गटातील महेंद्र गोडभरले, भादा जिप गटातील पद्माकर चिंचोलकर आणि भातागळी पंस गणातील पांडुरंग बालवाड, कामखेडा गणातील शरद दरेकर, शिवली गणातील सौ. प्रणिता यांच्या वतीने राजकारण साठे यांनी तर बोरी गणातील सौ. सिंधुताई खुरदळे यांच्या वतीने बंधू हनुमंत गव्हाणे यांनी सत्कार स्वीकारला.

याप्रसंगी भाजपाचे साहेबराव मुळे, वसंत करमुडे, लक्ष्मण यादव, किरण मुंडे, ॲड. सतीश बिराजदार, सोमनाथ पावले, गोविंद मुंडे, ओम चव्हाण, बालाजी गवळी, सुभाष राठोड, महादेव मुळे, रमेश पाटील, श्रीराम साळुंके यांच्यासह अनेकजण होते.

# लातूर विमानतळावर सुरक्षा विषयक उपाययोजनांना प्राधान्य द्या- पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले

**दै. अदिती एक्सप्रेस**




लातूर/ प्रतिनिधी- येथील विमानतळावर सुरक्षेच्या दृष्टीने आवश्यक उपाययोजनांना प्राधान्य द्यावे. यासाठी आवश्यक तांत्रिक बाबींच्या पूर्ततेसाठी महाराष्ट्र विमानतळ विकास महामंडळ आणि महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या अधिकाऱ्यांसह सर्व संबंधित अधिकाऱ्यांनी विमानतळाला संयुक्त भेट देवून पाहणी करावी. त्यानुसार कालबद्ध उपाययोजनांचा कृती आराखडा तयार करण्याच्या सूचना पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी दिल्या. जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या विमानतळविषयक बैठकीत ते बोलत होते.

आमदार संजय बनसोडे, आमदार अभिमन्यू पवार, जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहुल कुमार मीना, पोलीस अधीक्षक अमोल तांबे, लातूर शहर महानगरपालिका आयुक्त श्रीमती मानसी, उपजिल्हाधिकारी संगीता टकले, उपविभागीय अधिकारी रोहिणी नऱ्हे-विरोळे, लातूर विमानतळाचे व्यवस्थापक राजेश जीवन यांच्यासह महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे अधिकारी यावेळी उपस्थित होतेतसे. तसेच महाराष्ट्र विमानतळ विकास महामंडळाचे कार्यकारी अभियंता राजकुमार बॅरी हे दूरदृश्य प्रणालीद्वारे या बैठकीमध्ये सहभागी झाले होते. विमानतळाच्या सुरक्षा भिंतीच्या बांधकामाला लवकरात लवकर सुरुवात करावी. येथील पांदन रस्त्याऐवजी शेतकऱ्यांना पर्यायी रस्ता उपलब्ध करून द्यावा. सुरक्षेच्या दृष्टीने आवश्यक तांत्रिक बाबी लक्षात घेवून आवश्यक कार्यवाही करावी. उपविभागीय अधिकारी, तहसीलदार यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधून याबाबत माहिती द्यावी. शेतकऱ्यांची गैरसोय होवू नये, याची काळजी घ्यावी, असे पालकमंत्री श्री. भोसले यांनी सांगितले. महाराष्ट्र विमानतळ विकास महामंडळाचे कार्यकारी अभियंता श्री. बॅरी यांनी विमानतळावर प्रस्तावित करण्यात येणाऱ्या कामांची माहिती दिली. तसेच लवकरच लातूर विमानतळाची संयुक्त पाहणी करण्यात येईल, असे सांगितले.

# शिवाजी विद्यालय बिटरगाव येथे शुभेच्छा प्रदान कार्यक्रम संपन्न




**दै. अदिती एक्सप्रेस**

लातूर - जेएसपीएम लातूर संचलित शिवाजी विद्यालय बिटरगाव येथे इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी शुभेच्छा प्रदान कार्यक्रम उत्साहात व आनंदमय वातावरणात संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक मा. श्री. सूर्यकांत चव्हाण सर उपस्थित होते.

यावेळी विद्यार्थ्यांना त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा देत मार्गदर्शन करण्यात आले. सरांनी आपल्या मनोगतात विद्यार्थ्यांना आत्मविश्वास, सातत्य आणि प्रामाणिक परिश्रम यांच्या बळावर यश संपादन करण्याचे आवाहन केले. 'यश हे केवळ गुणांमध्ये नसून चांगल्या व्यक्तिमत्वात आहे,' असा प्रेरणादायी संदेश त्यांनी दिला.

शिक्षकांनीही विद्यार्थ्यांना आशीर्वाद व शुभेच्छा दिल्या. विद्यार्थ्यांनी आपल्या भावना व्यक्त करत शाळेतील आठवणींना उजाळा दिला. कार्यक्रमामुळे वातावरण भावूक तसेच प्रेरणादायी झाले.

शेवटी सर्व विद्यार्थ्यांना श्री वसंत यादव ,वेणूनाथ यादव,विनोद जाधव, गौतम जाधव, मल्लिकार्जुन ठोंबरे, अरुण काळे, रमाकांत यशवंत, पद्माकर लकडे यांनी पुढील वाटचालीसाठी हार्दिक शुभेच्छा देऊन कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

## मंगळवारी भूकंपविषयक आपत्ती व्यवस्थापनाची रंगीत तालीम

**लातूर-** भूकंपासारख्या आपत्तीच्या व्यवस्थापनासाठी करावयाच्या उपाययोजनांची रंगीत तालीम मंगळवार, १७ फेब्रुवारी रोजी सकाळी १० वाजता जिल्हा क्रीडा संकुल येथे आयोजित करण्यात आली आहे. राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दलाचे (एनडीआरएफ) पथक व जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाच्यावतीने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

भूकंपामुळे निर्माण होणाऱ्या आपत्तीत कशाप्रकारे प्रतिसाद द्यावा, काय करावे व काय करू नये, याबाबतची माहिती एनडीआरएफ पथकामार्फत यावेळी दिली जाणार आहे. जिल्ह्यातील आपत्ती व्यवस्थापनाशी संबंधित सर्व शासकीय यंत्रणांचे अधिकारी-कर्मचारी, स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी, शोध व बचाव पथके यामध्ये सहभागी होणार आहेत. तसेच आपत्ती व्यवस्थापनातील महत्वाच्या बाबींची माहिती यावेळी देण्यात येणार आहे. जिल्ह्यातील स्वयंसेवी संस्था, प्रसारमाध्यमांचे प्रतिनिधी, विद्यार्थी व नागरिकांनी उपस्थित राहण्याचे आवाहन जिल्हा आपत्ती प्राधिकरणच्यावतीने करण्यात आले आहे.

# लातूरच्या १००१ महाविद्यालयीन युवक युवतींना मोफत हेल्मेट वितरण

## उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त सामाजिक उपक्रम



**दै. अदिती एक्सप्रेस**

लातूर/ प्रतिनिधी- राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त शहरातील १००१ महाविद्यालयीन युवक युवतींना मोफत हेल्मेट वितरण करून लातूर शिवसेनेने एक अनोखा सामाजिक उपक्रम राबविला. शिवसेना निरीक्षक धीरज देशमुख आणि जुगलकिशोर तोष्णीवाल यांच्या संकल्पनेतून हा उपक्रम यशस्वी करण्यात आला.

दयानंद महाविद्यालय सभागृहात संपन्न झालेल्या या उपक्रमात शहरातील महाविद्यालयीन युवक युवती मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी महापौर सुरेश पवार तर प्रादेशिक परिवहन विभागातील मोटार वाहन निरीक्षक अभिजीत रेळे, शिवप्रसाद तोष्णीवाल, रवी चव्हाण, संदीप पाटील, श्रीकांत रांजणकर यांची प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी राज्याचे आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर, पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील, आमदार संतोष बांगर यांनी दूरध्वनीवर उपस्थित विद्यार्थ्यांशी संवाद साधला आणि या लोकाभिमुख उपक्रमासाठी आयोजकांचे कौतुक देखील केले. मोटार वाहन निरीक्षक अभिजीत रेळे यांनी रस्ता सुरक्षा अभियाना अंतर्गत विद्यार्थ्यांना सविस्तर मार्गदर्शन करून हेल्मेट हे आपले जीवरक्षक आयुध आहे. प्रत्येक नागरिकाने वाहन चालविताना याचा वापर करण्याचे आवाहन केले. उपस्थित सर्व विद्यार्थ्यांना यावेळी सामूहिक रस्ता सुरक्षा विषयक शपथ घेतली. या उपक्रमाच्या यशस्वितेसाठी कुलदीप सूर्यवंशी, बालाजी घोडसे, निलेश मांदळे, प्रीती कोळी, अर्चना बिराजदार, उत्तम लोंढे, विश्वास कुलकर्णी, मनोज जोशी, जाकीर सय्यद, प्रितेश भंडारी यांच्यासह अनेक शिवसैनिकांनी परिश्रम घेतले.

# 'महारेशीम अभियान २०२६' अंतर्गत रेशीम रथाला पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी दाखविली हिरवी झेंडी

**दै. अदिती एक्सप्रेस**



लातूर, : रेशीम शेतीची माहिती शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी जिल्ह्यात १० फेब्रुवारी २०२६ ते ११ मार्च २०२६ या कालावधीत 'महारेशीम अभियान २०२६' अभियान राबविण्यात येत आहे. यानिमित्त रेशीम शेतीच्या प्रचार आणि प्रसारासाठी जिल्हा रेशीम कार्यालयाने तयार केलेल्या रेशीम रथाला आज पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी हिरवी झेंडी दाखविली.

जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात झालेल्या या कार्यक्रमाला आमदार विक्रम काळे, आमदार संभाजी पाटील निलंगेकर, आमदार संजय बनसोडे, आमदार अभिमन्यू पवार, जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहुल कुमार मीना, पोलीस अधीक्षक अमोल तांबे, लातूर शहर महानगरपालिका आयुक्त श्रीमती मानसी यांच्यासह रेशीम उत्पादक शेतकरी यावेळी उपस्थित होते. रेशीम शेतीचे फायदे व त्यातून मिळणाऱ्या हमखास व शाश्वत उत्पन्नाची माहिती देण्यासाठी रेशीम रथ गावा-गावांमध्ये जाणार आहे. महारेशीम अभियान अंतर्गत जिल्ह्यात रेशीम शेतीच्या प्रसारासाठी, माहिती देण्याबरोबरच नवीन रेशीम लागवडसाठी शेतकऱ्यांची नोंदणी करण्यात येणार आहे. शेतकऱ्यांचा आर्थिक स्तर व जीवनमान उंचावण्यास रेशीम शेतीमुळे मदत होणार आहे, असे जिल्हा रेशीम विकास अधिकारी एस. बी. वराट यांनी सांगितले.

# ज्योतिष विद्यावाचस्पती विजयकुमार स्वामी यांना राज्यस्तरीय अध्यात्मिक पुरस्कार जाहीर

**दै. अदिती एक्सप्रेस**

लातूर : उल्लेखनीय अध्यात्मिक साधना, समाजाभिमुख कार्य आणि निस्वार्थ सेवाभावासाठी ज्योतिष विद्यावाचस्पती विजयकुमार स्वामी यांना धगधगती मुंबई वृत्तपत्र समूहाच्या वतीने राज्यस्तरीय अध्यात्मिक पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे.

पुणे येथे कार्यरत असलेले विजयकुमार स्वामी हे केवळ ज्योतिषशास्त्राचे अभ्यासक नसून, समाजालाच ईश्वर मानून सेवा करणारे सेवाव्रती व्यक्तिमत्वाचे धनी म्हणून ओळखले जातात.

आपल्या ज्योतिषज्ञानाचा उपयोग त्यांनी कधीही वैयक्तिक स्वार्थासाठी न करता समाजातील दुःखी, कष्टी व उपेक्षित घटकांच्या जीवनात आशेचा प्रकाश निर्माण करण्यासाठी केला आहे. संत तुकाराम महाराजांच्या जे का रंजले गांजले, त्यासी म्हणावे आपले या विचारांचे ते मूर्तिमंत उदाहरण मानले जातात. सामाजिक बांधिलकी जपत त्यांनी विद्यार्थ्यांना गणवेश, दप्तर, पुस्तके वाटप, गरजूंना ब्लँकेट वितरण, विद्यार्थी वसतिगृह व वृद्धाश्रमांमध्ये अन्नदान असे अनेक उपक्रम सातत्याने राबवले आहेत. त्यांनी स्थापन केलेली



भक्ती प्रकाशन ही संस्था गेल्या पंधरा वर्षांपासून कार्यरत असून, दसरा व दिवाळीच्या पर्वावर प्रकाशित होणारा 'भविष्य' वार्षिकांक समाजप्रबोधनाचे कार्य करत आहे. या प्रकाशनातून मिळणारे उत्पन्नही समाजकार्यासाठी अर्पण केले जाते. हा पुरस्कार सोहळा लवकरच स्वर्गीय अण्णासाहेब पाटील सभागृह, सेक्टर ४/५, कोपरखैरणे, नवी मुंबई येथे मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडणार आहे. यापुरस्काराच्या घोषणेने विद्यावाचस्पती विजयकुमार स्वामी यांचे विविध क्षेत्रांतून अभिनंदन होत आहे.

## गळफास घेऊन एकाची आत्महत्या

**उदगीर, दि.१२-** शहरातील रिंगरोड लगत असलेल्या शेतातील चिंचेच्या झाडाला एका व्यक्तीने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना सोमवारी घडली आहे.

मलकापूर भागातील क्रांतीनगर येथील रहिवासी असलेले मयत मोहसीन अफजलखान पठाण (वय ३९) याने सोमवारी सकाळी येथील बायपास रिंगरोडच्या बाजूस सोनवणे यांच्या शेतामध्ये चिंचेच्या झाडाला गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना घडली आहे. या प्रकरणी अमीर पठाण यांनी उदगीर ग्रामीण पोलिसांत दिलेल्या माहितीवरून अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

# दयानंद विज्ञान महाविद्यालयाच्या प्राणीशास्त्र व मत्स्यशास्त्र विभागातर्फे शैक्षणिक सहलीचे आयोजन

**दै. अदिती एक्सप्रेस**



लातूर : दि.११ फेब्रुवारी २०२६ रोजी लातूर येथील दयानंद विज्ञान महाविद्यालयाच्या प्राणीशास्त्र व मत्स्यशास्त्र विभागातर्फे एम.एस्सी. व बी.एस्सी.च्या विद्यार्थ्यांची शैक्षणिक सहल चाकूर येथील मधुमक्षिका पालन केंद्र येथे गेली होती.या सहलीचे आयोजन महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ. सिद्धेश्वर बेल्लाळे व विभाग प्रमुख डॉ.रवी सोळुंके यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते.शैक्षणिक सहलीचे समन्वयक प्राणीशास्त्र पदव्युत्तर समन्वयक डॉ.अमोल ठोसर होते.तसेच प्रा.डी. एस. धरणे व प्रा. मनाली आगलावे उपस्थित होत्या.

सदरील सहलीदरम्यान विद्यार्थ्यांना मधुमक्षिका पालनाचे तंत्र,जीवनचक्र, मधुमक्षिकांचे आरोग्य आणि त्यातून मिळणाऱ्या विविध उत्पादनांविषयी मार्गदर्शन करण्यात आले.आदित्य पाटील यांनी विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष प्रदर्शन करून मधुमक्षिका पालन कसे करावे, मधुमक्षिका घरटे कसे व्यवस्थापित करावे आणि मधुमक्षिकांपासून मिळणाऱ्या मध व इतर उत्पादनांचा योग्य उपयोग कसा करावा हे सविस्तर सांगितले.याशिवाय मधुमक्षिका पालन केंद्राचे प्रमुख कृषी भूषण दिनकर पाटील यांनीही विद्यार्थ्यांना मधुमक्षिका पालनातील व्यावहारिक अडचणी, जैवविविधतेवरील परिणाम, तसेच आर्थिक संधी याबाबत माहिती दिली. विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष निरीक्षण केले आणि विविध प्रश्न विचारून सखोल माहिती मिळवली.ही शैक्षणिक सहल विद्यार्थ्यांसाठी फक्त थेट अनुभव घेण्यापुरती नव्हती, तर प्राणीशास्त्र व मत्स्यशास्त्र क्षेत्रातील व्यावहारिक ज्ञान वाढविण्यासाठी आणि संशोधन क्षमता विकसित करण्यासाठी उपयुक्त ठरली. सहलीत सहभागी विद्यार्थ्यांना मधुमक्षिका पालनाबाबत सखोल समज आली व भविष्यातील प्राणिशास्त्र संशोधनासाठी महत्त्वपूर्ण अनुभवही आला.

# राजर्षी शाहू महाविद्यालयाच्या कॅडेटचा महाराष्ट्र संचलन संघात प्रजासत्ताक दिन परेडसाठी सहभाग

**दै. अदिती एक्सप्रेस**




लातूर (प्रतिनिधी) लातूर येथील शिव छत्रपती शिक्षण संस्था संचलित राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर येथील सिनिअर अंडर ऑफिसर हितेश सुरवसे याने २६ जानेवारी २०२६ रोजी नवी दिल्ली येथे संपन्न झालेल्या प्रजासत्ताक दिन परेडमध्ये महाराष्ट्र संचलन संघातून यशस्वी सहभाग नोंदवला.

कर्तव्यपथ, नवी दिल्ली येथे मा. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या उपस्थितीत पार पडलेल्या या भव्य परेडमध्ये हितेशने एनसीसी महाराष्ट्र डायरेक्टरेटच्या टीममध्ये मुख्य संचलनासाठी सहभाग घेत महाविद्यालय व ५३ महाराष्ट्र बटालियन एनसीसी, लातूर यांचा नावलौकिक उंचावला.

या उल्लेखनीय यशाबद्दल ५३ महाराष्ट्र बटालियन एनसीसी, लातूरचे कमांडिंग ऑफिसर कर्नल संतोष नवगण, ॲडम ऑफिसर कर्नल वाय. बी. सिंह, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे, उपप्राचार्य प्रा. सदाशिव शिंदे तसेच लेफ्टनंट डॉ. महेश वावरे व लेफ्टनंट डॉ. अर्चना टाक यांनी हितेश सुरवसे याचा सत्कार करून अभिनंदन केले. यावेळी मार्गदर्शन करताना कर्नल संतोष नवगण यांनी कॅडेट्सनी एनसीसीमधील प्रशिक्षणाचा योग्य उपयोग करून आपले भवितव्य घडवावे व देश-समाजसेवेसाठी सदैव तत्पर राहावे, असे आवाहन केले. एनसीसीमधील तीन वर्षांचा कालावधी वाया न घालवता स्पर्धा परीक्षांद्वारे सक्षम अधिकारी होण्याचे ध्येय ठेवावे, असेही त्यांनी सांगितले.

आजचे युग स्पर्धेचे आहे. या स्पर्धेत आपले स्थान भक्कम करायचे असेल, तर कॅडेट्सनी अष्टपैलू व्यक्तिमत्त्व विकसित करून स्वतःची स्वतंत्र ओळख निर्माण करावी, असेही त्यांनी प्रतिपादन केले.

या सत्कार समारंभास ॲडम ऑफिसर कर्नल वाय. बी. सिंह, लेफ्टनंट महेश वावरे, बाजीराव पाटील, संजय चिकने, आर्मी स्टाफ तसेच कार्यालयीन कर्मचारी उपस्थित होते.